दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

शाकुंभरी देवीची ज्योत घेऊन येणाऱ्या ट्रॅक्टर-ट्रॉलीला अपघात; 4 जणांचा मृत्यू, 12 गंभीर

उत्तर प्रदेश : नवरात्रीच्या आनंदावर विरघळवणारी एक अत्यंत दुर्दैवी घटना उत्तर प्रदेशातील सहारनपुरमधून समोर आली आहे. मां दुर्गाच्या स्वागताची तयारी करणाऱ्या काही श्रद्धाळूंच्या आयुष्यात या अपघाताने काळाने घाला घातला आहे. शाकुंभरी देवीच्या मंदिरावरून पवित्र ज्योत घेऊन आपल्या गावकऱ्यांकडे परतणाऱ्या एका ट्रॅक्टर-ट्रॉलीला भरधाव कंटेनरने जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात चार जणांचा जागीच मृत्यू झाला असून, एक डझनहून अधिक भाविक गंभीर जखमी झाले आहेत.

आडाचीवाडी ग्रामपंचायत ठरली महाराष्ट्रात सर्वोत्तम! 5 कोटींचे बक्षीस

पुणे : लोकसहभागाच्या जोरावर ग्रामसमृद्धीचा नवा आदर्श घालत पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील आडाचीवाडी ग्रामपंचायतीने 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान 2025-26' मध्ये संपूर्ण महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावला आहे. नाशिक येथे पार पडलेल्या एका शानदार आणि भव्य सोहळ्यात हा बहुमान प्रदान करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते आडाचीवाडी ग्रामपंचायतीचा गौरव करण्यात आला.

छत्रपती संभाजीनगर ❀ सोमवार, दि. १२ ऑक्टोबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १७१ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

थोडक्यात वार्ता

एसआयडीएम चॅम्पियन पुरस्कार 2026 प्रदान

मुंबई - अदाणी डिफेन्स अँड एरोस्पेसला संरक्षण आणि एरोस्पेस क्षेत्रातील उत्कृष्ट निर्यात कामगिरीसाठी प्रतिष्ठित सोसायटी ऑफ इंडियन डिफेन्स मॅन्युफॅक्चरर्स) चॅम्पियन पुरस्कार 2026 देऊन सन्मानित करण्यात आले आहे. 9 ऑक्टोबर रोजी नवी दिल्ली येथे आयोजित संस्थेच्या आठव्या वार्षिक अधिवेशनात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. संरक्षण साहित्याच्या निर्यातीत कंपनीने मिळवलेल्या यशाची या पुरस्कारातून दखल घेण्यात आली आहे. अदाणी डिफेन्स अँड एरोस्पेस कंपनी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत संरक्षण दल आणि कायदा व सुव्यवस्था राखणाऱ्या यंत्रणांसाठी लहान आकाराच्या कॅलिबरच्या दारूगोळ्याचे उत्पादन करते.

2026 फॉर्च्युनर लीडर एडिशन सादर

बंगळुरू: टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज आपल्या सर्वात प्रतिष्ठित एसयूव्ही पैकी एक असलेल्या फॉर्च्युनरचे नवीन लीडर एडिशन सादर करण्याची घोषणा केली. या नव्या आवृत्तीत केबिनमधील अनुभव अधिक परिष्कृत करण्यात आला आहे. आत्मविश्वास आणि महत्त्वाकांक्षेने नेतृत्व करणाऱ्या ग्राहकांसाठी तयार करण्यात आलेले हे नवीन एडिशन फॉर्च्युनरचे प्रीमियम आकर्षण अधिक वाढवते. त्याचबरोबर, फॉर्च्युनरला दीर्घकाळापासून यशस्वी बनवणारी मूलभूत वैशिष्ट्ये कायम ठेवण्यात आली आहेत.

साबुदाणा पासून राजगिऱ्याच्या भाकरीपर्यंत

मुंबई - नवरात्रीनिमित्त सोनी सबचे कलाकार तोरल रसपुत्रा, गुलकी जोशी, मनीष वाधवा आणि करुणा पांडे यांनी त्यांच्या आवडत्या उपवासाच्या पदार्थांबद्दल आणि या उत्सवी काळात पाळल्या जाणाऱ्या खास खाद्यपरंपरांबद्दल सांगितले.नवरात्री हा श्रद्धा, कुटुंब आणि परंपरांचा उत्सव आहे आणि या सणात खाद्यपदार्थांनाही विशेष महत्त्व असतं. दिलासा देणाऱ्या साबुदाण्याच्या पदार्थांपासून ते पौष्टिक राजगिऱ्याच्या पदार्थांपर्यंत आणि घरी बनवल्या जाणाऱ्या उपवासासाठीच्या आवडत्या खाद्यपदार्थांपर्यंत, हा उत्सव उपवास पाळताना परिचित चवींचा आनंद घेण्याचे अनेक पर्याय देतो.

'सोयीनुसार रंग बदलणं म्हणजे काँग्रेसचं राजकारण'

मुंबई - भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी काँग्रेसच्या दुटप्पी राजकारणावर टीका करणारी सोशल मीडिया पोस्ट शेअर केली. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा कोलकाता येथील व्हिडिओ शेअर करत त्यांनी काँग्रेसवर जोरदार घणाघात केला. पश्चिम बंगाल भाजप विधिमंडळाच्या बैठकीत केंद्रीय गृहमंत्री बोलत होते.रविंद्र चव्हाण यांनी आपल्या पोस्टमध्ये नमूद केले की, 'सोयीनुसार रंग बदलणं म्हणजे काँग्रेसचं राजकारण! ज्या राज्यांमध्ये तब्बल ४०-४० वर्षे काँग्रेसचा मुख्यमंत्री होऊ शकला नाही, तिथे त्यांच्याच मित्रपक्षांची सत्ता होती. व्होट चोरीचा आरोप करणारे राहुल गांधी आणि काँग्रेस नेते याबद्दल तोंडातून 'ब्र' देखील काढणार नाहीत. 'चोराच्या उलट्या बोंबा' म्हणतात ते हेच!'

टिपर - पिकअपच्या भीषण धडकेत दोन युवकांचा मृत्यू

अंबाजोगाई : बीड जिल्ह्यातील नेकनूरजवळ टिपर आणि पिकअप यांच्यात भीषण अपघात झाला आहे. या दुर्घटनेत अंबाजोगाई शहरातील बाराभाई गल्ली येथील शौकत भाई कुरैशी यांच्या दोन मुलांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे अंबाजोगाई शहरात हळहळ व्यक्त होत आहे.



पहिल्याच माळेला कर्णपुरात भाविकांची दर्शनासाठी मोठी गर्दी; नवरात्रोत्सवाला उत्साहात प्रारंभ

आ.दानवे यांच्या हस्ते घटस्थापना व महाआरती

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : शहराचे ग्रामदैवत असलेल्या कर्णपुरा येथील श्री तुळजाभवानी मातेच्या शारदीय नवरात्रोत्सवाला रविवारी भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला. मंदिर संस्थापक अध्यक्ष तथा आमदार अंबादास दानवे यांच्या हस्ते सकाळी सात वाजता घटस्थापना करण्यात आली. पारंपरिक वाद्यांच्या गजरात महाआरती करून उत्सवाची





सुरुवात झाली. पहिल्याच माळेला देवीच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. भाविकांची वाढती वर्दळ लक्षात घेता मंदिर परिसरात पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

तब्बल ३५० वर्षांची ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या कर्णपुरा मंदिरात नवरात्रोत्सवाला विशेष महत्त्व आहे. नऊ दिवस चालणाऱ्या या उत्सवासाठी छत्रपती संभाजीनगर शहरासह राज्याच्या विविध भागांतून हजारो भाविक दर्शनासाठी येतात. नवरात्रोत्सवानिमित्त कर्णपुरा मैदानावर भव्य यात्राही भरते. त्यामुळे या काळात मंदिर परिसरात भाविकांची मोठी वर्दळ असते.

यंदा राज्यातील शेतकऱ्यांवर आलेले संकट दूर व्हावे, त्यांना सुखाचे दिवस यावेत आणि सर्वांच्या जीवनात सुख-समृद्धी नांदावी, यासाठी आमदार अंबादास दानवे यांनी आई तुळजाभवानीच्या चरणी साकडे घातले. शेतकऱ्यांच्या संकटातून मुक्तीसह सर्वांच्या कल्याणाची प्रार्थना करत त्यांनी नवरात्रोत्सवाचा प्रारंभ केला.

ऐतिहासिक परंपरा, देवीवरील श्रद्धा आणि नवरात्रोत्सवाच्या उत्साहामुळे कर्णपुरा परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. पुढील नऊ दिवस देवीच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी कायम राहण्याची शक्यता असल्याने मंदिर परिसरात पोलिसाचा मोठा बंदोबस्त असणार आहे.

आम्हाला असा भारत नको..' इंडियाचा आघाडीचा अभूतपूर्व निर्णय, थेट सुप्रीम कोर्टावर मोर्चा धडकणार

राहुल गांधी म्हणाले, 'हा राजकीय पक्षांचा मोर्चा नाही, तर..'

नवी दिल्ली : देशाच्या इतिहासामध्ये बहुदा पहिल्यांदा थेट सर्वोच्च न्यायालयावरती मोर्चा धडकणार आहे. ज्ञानेश कुमार यांच्या विरोधामध्ये देशामध्ये रणकंदन सुरु असतानाच इंडिया आघाडीने मोठा निर्णय घेतला आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज ट्विट करत या संदर्भामध्ये भूमिका स्पष्ट केली आहे. हा मोर्चा राजकीय पक्षांचा नसून एक भारतीय म्हणून आपण सर्वोच्च न्यायालयावर मोर्चा काढणार असून सरन्यायाधीशांना निवेदन देणार असल्याचं राहुल गांधी यांनी म्हटलं आहे. या मोर्चामध्ये आपण पक्ष, लिंग, जात, समुदाय आणि राज्यांच्या भिंती ओलांडून एकत्रित मोर्चा काढणार आहोत. देशातील तरुण, सर्व विरोध पक्ष, नागरी समाज आणि लोकशाहीवरती विश्वास ठेवणारे व भारताच्या संविधानाशी पाठीशी उभे राहणारे सर्वजण आमच्या सामील होतील, असा विश्वास राहुल गांधी यांनी व्यक्त केला.



हे डरपोक आम्हाला घाबरू शकत नाही

मतचोरी थांबवा, एसआयआर बंदी, ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी या संदर्भामध्ये देशाच्या सरन्यायाधीशांना निवेदन सादर करणार असल्याचं म्हटलं आहे. राहुल गांधी यांनी आपल्या व्हिडिओमध्ये म्हटलं आहे की, नरेंद्र मोदी, अमित शहा, अजय डोवाल, मोहन भागवत भारताचा आवाज दाबू शकत नाही. हे डरपोक आम्हाला घाबरू शकत नाही. त्यांना माघार घ्यावीच लागेल. आम्ही सर्वजण प्रेम, बंधुभाव आणि देशभक्तीने एकत्र मोर्चा काढू. घाबरू नका उद्या संपूर्ण भारत सर्वोच्च न्यायालयावरती मोर्चा काढेल अशी घोषणा राहुल गांधी यांनी केली.

राहुल गांधी यांनी म्हटलं आहे की, देशातील तरुण दिल्ली शांततापूर्ण आंदोलनासाठी रस्त्यावर उतरला आहे. त्यांची हृदये प्रेमाने भरलेली होती. द्वेष किंवा रागाने नव्हती, पण त्यांना पोलिसांनी आणि भाजपच्या गुंडांनी मारहाण केली. आम्हाला असा भारत नको आहे, त्यामुळे सोमवारी 12 ऑक्टोबर रोजी आम्ही भारतीय म्हणून सर्वोच्च न्यायालयावरती मोर्चा काढणार आहोत. यामध्ये पक्ष, लिंग, जात, समुदाय आणि राज्यांच्या भिंती ओलांडून आम्ही एकत्रित मोर्चा काढू, असंही राहुल गांधी यांनी म्हटलं आहे. त्यामुळे आता ज्ञानेश कुमार यांच्या विरोधामध्ये देशामध्ये उद्रेक झाला असतानाच आता उद्याच्या मोर्चानंतर विरोधी पक्षांनी सुद्धा आरपारच्या लढाईचं रणशिंग फुंकल्याचं स्पष्ट झालं आहे.

पनामात भूकंप! 7.7 तीव्रतेच्या धक्क्यानंतर अमेरिकेकडून 9 देशांना त्सुनामीचा हाय अलर्ट

पनामा : मध्य अमेरिकेतील पनामा देशाच्या किनारपट्टीवर शुक्रवारी रात्री एक अत्यंत भयानक नैसर्गिक आपत्ती ओढवली. रिश्टर स्केलवर ७.७ इतकी प्रचंड तीव्रता नोंदवलेला एक महाभयंकर भूकंप भूगर्भात झाला. या अज्ञानातून आणि तीव्र धक्क्यानंतर संपूर्ण अमेरिका खंडात खळबळ उडाली आहे. अमेरिकेच्या दूतावासाने तात्काळ पावले उचलत मध्य आणि दक्षिण अमेरिकेतील तब्बल नऊ देशांसाठी त्सुनामीचा मोठा इशारा जारी केला आहे, ज्यामुळे किनारपट्टीवरील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

राष्ट्रीय भूकंप विज्ञान केंद्राने (NCS) सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर दिलेल्या माहितीनुसार, हा शक्तिशाली भूकंप ९ ऑक्टोबर रोजी रात्री ११ वाजून २६ मिनिटांनी (भारतीय वेळेनुसार) झाला. या भूकंपाचे केंद्र जमिनीखाली अगदी १० किलोमीटर एवढ्या कमी खोलीवर होते, ज्यामुळे त्याचे हादरे अधिक तीव्रतेने जाणवले. पनामाची राजधानी पनामा सिटीपासून हे केंद्र सुमारे २०६ किलोमीटर नैऋत्य दिशेला समुद्रात होते, तर स्थानिक वेळेनुसार रात्री १२.५६ वाजता ला पिटालोझा भागात याचा मुख्य सुळका बसला. ९ देशांच्या किनाऱ्यांवर त्सुनामीचे सावट : अमेरिकन त्सुनामी इशारा यंत्रणेने या घटनेची अत्यंत गंभीर दखल घेतली आहे. भूकंपाच्या प्रचंड तीव्रतेमुळे समुद्रात महाकाय लाटा उसळण्याची दाट शक्यता वर्तवण्यात आली आहे. या धोक्याच्या छायेत कोस्टा रिका, एल साल्व्हाडोर, पेरू, मेक्सिको, ग्वाटेमाला, पनामा, निकारागुआ, कोलंबिया आणि इक्वेडोर हे नऊ देश असून, या सर्व देशांच्या किनारपट्टीवरील प्रशासनाला हाय अलर्टवर ठेवण्यात आले आहे.

मुंबईतील झगमगाटावर निर्बंध? प्रकाश प्रदूषण रोखण्यासाठी

मुंबई : हे शहर दिवसरात्र गजबजलेलं असतं. रात्रीच्यावेळी मुंबईत खास करून दक्षिण मुंबई तसेच वांद्रे परिसरात झगमगते जाहिरातीचे फलक आपल्याला सर्रास पाहायला मिळतात. परिसरात राहणाऱ्या व्यक्तींना या प्रखर प्रकाशाचा सामना करावा लागतो. तसरच रात्री प्रवास करणाऱ्या नागरिकांना रस्त्यावरील या प्रखर प्रकाशाचा सामना करावा लागतो. मुंबई उच्च न्यायालयाने आता मुंबईकरांच्या समस्येवर तोडगा काढला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने शुक्रवारी (०९ ऑक्टोबर) मुंबई आणि लगतच्या शहरांमध्ये निऑन लाईट्सच्या वापरावर बंदी घालणारा फेब्रुवारी १९९८ मधील आदेश यावर्षी विशेषतः सणासुदीच्या काळात प्रभावीपणे अंमलात आणला जाईल, याची खात्री करण्याचे निर्देश महाराष्ट्र सरकारला दिले आहेत. प्रकाश प्रदूषण टाळण्यासाठी हा आदेश देण्यात आला आहे. या आदेशानुसार रात्री ११ वाजेपर्यंत हे निऑन दिवे बंद करणे आवश्यक आहे.

शिवाजी पार्क परिसरात आंदोलन करणाऱ्या 300 हून अधिक आंदोलकांवर गुन्हा दाखल होणार

मुंबई : मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी आंदोलन करणाऱ्या आंदोलकांवर आता मुंबई पोलिसांनी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. यामध्ये सीजेपी, ठाकरेंची शिवसेना, मनसेच्या कार्यकर्त्यांसोबतच इतरही आंदोलकांवर गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. यामध्ये अमित ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात येतोय का याकडे सर्वांचं लक्ष आहे. मुंबई पोलिसांनी तब्बल 300 आंदोलकांना ताब्यात घेतलं होतं आणि नंतर त्यांना सोडण्यात आलं होतं.

देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा यासाठी नवी दिल्लीत सीजेपीचे आंदोलन सुरू आहे. त्या आधी तीन दिवस राहुल गांधींच्या नेतृत्वाखाली इंडिया आघाडीने आंदोलन केलं होतं. त्याच पार्श्वभूमीवर रविवारी मुंबईतील शिवाजी पार्क परिसरात सीजेपीने आंदोलनाची हाक दिली होती.

सीजेपीच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मुंबई पोलिसांनी रविवारी सकाळपासूनच शिवाजी पार्क परिसरात तगडा बंदोबस्त ठेवला होता. त्या भागात जाणाऱ्या प्रत्येकाची कसून चौकशी केली जात होती. अशातही आंदोलनासाठी जाणाऱ्या काही आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेतलं.

दरम्यान, शिवाजी पार्क परिसरातील कार्यकर्त्यांना ताब्यात घेतलं जात असताना त्या ठिकाणी अमित ठाकरे पोहोचले आणि त्यांनी पोलिसांना जाब विचारला. आंदोलकांना ताब्यात घेण्यास मनसे पदाधिकाऱ्यांनी विरोध केला. त्यावेळी मनसेच्या काही नेत्यांसह कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतलं.


दुसरीकडे, शिवसैनिक आणि मुंबई पोलिसांमध्ये जोरदार राडा झाल्याचं दिसून आलं. सीजेपीकडून मुंबईतील शिवाजी पार्कमध्ये आंदोलानाची हाक देण्यात आली होती. मात्र, सीजेपीच्या आंदोलनाला पोलिसांनी परवानगी दिली नव्हती. त्यामुळे पोलिसांनी आंदोलकांची धरपकड करण्यात सुरु केली होती. सीजेपीला पाठिंबा देण्यासाठी युवा सेनेकडून आंदोलन करण्यात येणार होतं. मात्र, पोलिसांनी शिवसेना भवनात घुसण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप शिवसैनिकांनी केला. यामुळं मोठा राडा झाल्याचं पाहायला मिळालं.


लक्ष्य महेश्वरी यांच्या 'खुशियाँ'मधून आनंदी जीवनाची पाच सूत्रे

डॉ. ए. ए. कादरी यांच्या मेंटल हेल्थ सेंटरच्या जनजागृती सप्ताहाचा समारोप; स्पर्धांतील विजेत्यांचा गौरव

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : प्रसिद्ध कथाकथनकार लक्ष्य महेश्वरी यांनी 'खुशियाँ' या विशेष कार्यक्रमातून आनंदी आणि समाधानी जीवन जगण्याची पाच सूत्रे उलगडली. स्वतःमध्ये आनंद शोधणे, अनावश्यक चिंता सोडून देणे, विचार आणि कृती यांचा संबंध समजून घेणे, मानवतेतील एकत्व जपणे आणि वर्तमानात जगणे, या सूत्रांच्या माध्यमातून त्यांनी मानसिक आरोग्य आणि सकारात्मक जीवनशैलीचा संदेश दिला. पडेगाव येथील डॉ. ए. ए. कादरी यांच्या मेंटल हेल्थ सेंटरतर्फे जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त आयोजित जनजागृती सप्ताहाची सांगता या कार्यक्रमाने झाली.





या कार्यक्रमाला राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा पालकमंत्री संजय शिरसाट प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, माजी खासदार इम्तियाज जलील, राज्य कर विभागाचे सहआयुक्त अभिजीत राऊत, केंद्रीय जीएसटी गुप्तचर महासंचालनालयाचे उपसंचालक नासिर इक्बाल मानेर, सहाय्यक पोलीस आयुक्त सागर देशमुख, भूसंपादन उपजिल्हाधिकारी मयूर भंगाळे, नगररचना विभागाचे माजी उपसंचालक मनोज गर्जे, अतिरिक्त आयुक्त रणजित पाटील आणि महानगरपालिका विरोधी पक्षनेते समीर साजिद यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.


स्वतःपासूनच मानसिक आरोग्याची सुरुवात

कन्सल्टिंग न्यूरोसायकियाट्रिस्ट डॉ. अझीझ अहमद कादरी यांनी 'इंडिव्हिज्युअल ॲज द वर्कप्लेस' या विषयावर मार्गदर्शन केले. मानसिक आरोग्याची सुरुवात प्रत्येक व्यक्तीने स्वतःपासून करणे आवश्यक आहे. विचार, भावना आणि कृती यांचे योग्य व्यवस्थापन तसेच शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि आध्यात्मिक आरोग्याचा समतोल राखणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

मानसिक आरोग्य जनजागृती सप्ताहात आयोजित विविध स्पर्धांतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. या उपक्रमांतून आत्मजाणीव, सकारात्मक दृष्टिकोन आणि आनंदी जीवनशैलीचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

उमरी फाट्याजवळील अपघातात शेळके दाम्पत्याचा मृत्यू ; मुलगी गंभीर जखमी

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी



परभणी**बोरवंड या रस्त्यावर उमरी फाट्याजवळ रस्त्यावर उभ्या असणाऱ्या एका टिप्परवर कार आदळल्याने झालेल्या अपघातात परभणीतील शेळके दांपत्याचा मृत्यू झाला. तर एक मुलगी गंभीर जखमी झाली. हि दुर्देवी घटना शनिवारी रात्री दहाच्या सुमारास घडली. परभणी येथील मध्यवस्तीतील गांधी पार्कतील रोहित दिलीपराव शेळके (वय 38) व माधवी रोहित शेळके (वय 35) हे दोघे दांपत्य मुलगीसह ब्रम्हपुरीला गेले होते.तेथून ते कारने परतत होते. त्यावेळी उमरी फाट्याजवळ रस्त्यावरच उभ्या असणाऱ्या टिप्परवर कार मागच्या बाजूने आदळली.

त्यात या दोघांचा मृत्यू झाला. तर मुलगी रितीक्षा गंभीर जखमी झाली,प्रत्यक्षदर्शींनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन मदत कार्य केले. जखमींना दाखल केले. या दुर्देवी घटनेने परभणीतील गांधी पार्क भागात मोठी शोककळा पसरली आहे. रोहित उर्फ बंटी या नावाने सुपरिचित रोहित यांचा मोठा मित्रपरिवार आहे. दरम्यान या दांपत्यावर दुपारी बारा वाजता परभणी येथील जिंतूर रस्त्यावरील वैकुंठ धाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

जागतिक बेघर दिन : "बेघरांना केवळ निवारा नव्हे, तर सन्मानाने जगण्याचा आधार देणे हाच उद्देश" प्रा. प्रशांत दंदे

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

जागतिक बेघर दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतर्फे चालविण्यात येणाऱ्या रेल्वे स्टेशन परिसरातील संत गाडगे महाराज शहरी बेघर निवारागृह, एन-सिक्स सिडको येथील सम्यक शहरी बेघर निवारा गृह आणि मोती कारंजा येथील जीवन आधार शहरी बेघर निवारागृहात विविध सामाजिक व जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.



यावेळी आरोग्यविषयक मार्गदर्शन, स्वच्छता जनजागृती, समुपदेशन, मनोरंजनात्मक व सांस्कृतिक कार्यक्रम, सामूहिक संवाद आणि स्नेहसंमेलन अशा उपक्रमांच्या माध्यमातून लाभार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करून त्यांना आपुलकीचा व सन्मानाचा अनुभव देण्याचा प्रयत्न करण्यात आला. या उपक्रमांत निवारागृहांतील प्रौढ, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती तसेच अनाथ बालक-मुलींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. त्यांच्या चेहऱ्यावरील आनंदाने कार्यक्रमाचे वातावरण भावनिक व उत्साहपूर्ण झाले. बेघर व्यक्तींनाही सन्मान, प्रेम आणि सुरक्षित जीवनाचा समान अधिकार आहे, हा माणुसकीचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांच्या मार्गदर्शनाखाली, अतिरिक्त आयुक्त कल्पिता पिंपळे यांच्या निर्देशानुसार आणि उपायुक्त अपर्णा थेटे यांच्या नियोजनानुसार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. सुनील शेरखाने यांनी भूषविले, तर प्रमुख पाहुणे म्हणून लालाभाऊ बुरुडे उपस्थित होते. समाज विकास अधिकारी विनोद परदेशी व सुनील कसेवाड यांचीही प्रमुख उपस्थिती लाभली. बोधी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे संचालक प्रशांत दंदे यांनी प्रास्ताविकातून जागतिक बेघर दिनाचे महत्त्व विशद केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी आकाश बेलकर, नितीन वाघमारे, आनंद ताजणे, रोहित रत्नपारखी, महादेव व्यवहारे व संजय देवतवाल यांनी विशेष परिश्रम घेतले. जीवन जागृती वैद्यकीय व सामाजिक संस्थेचे सचिव डॉ. फारुख पटेल यांनी आभार मानले. "बेघर व्यक्तींच्या चेहऱ्यावर हास्य फुलविणे, त्यांना आपलेपणाची जाणीव करून देणे आणि सन्मानाने जगण्याची उमेद देणे, हीच या उपक्रमाची खरी फलश्रुती आहे." अशी भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

सं पा द की य

शिवाजी पार्कमधील आंदोलन, राजकीय संघर्ष-प्रशासकीय कोंडी

मुंबईतील ऐतिहासिक शिवाजी पार्क परिसरात आजवर अनेक राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक आंदोलने झाली आहेत; परंतु आंदोलनादरम्यान विद्यार्थी आणि नेत्यांना ताब्यात घेण्याची अशी घटना घडल्याने या परिसराला एकाएकी छावणीचे स्वरूप प्राप्त झाले आहे. निवडणूक आयोगाच्या काही निर्णयांविरोधात आणि स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांच्या मागण्यांच्या पार्श्वभूमीवर आंदोलन करणाऱ्या ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे आणि इतर आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेतल्याने राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. एका बाजूला सण-उत्साहाचे वातावरण असताना दुसरीकडे राजधानी दिल्लीसह मुंबईत वाढलेला पोलीस बंदोबस्त आणि सत्ता बदलाच्या इशाऱ्यांमुळे राजकारणात संघर्षाची नवी ठिणगी पडली आहे. निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर आणि अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत विरोधी पक्षाने आक्रमक पवित्रा घेतला आहे. राहुल पवार आणि इतर विद्यार्थी नेत्यांना आंदोलनादरम्यान ताब्यात घेणे, मेट्रो व रेल्वे सेवांवर निर्बंध येणे आणि संपूर्ण परिसरात कडेकोट बंदोबस्त लावणे यावरून सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील तणाव पराकोटीला पोहोचला आहे. विरोधकांच्या मते, लोकशाही मार्गाने आवाज उठवण्याचा अधिकार दडपण्याचा हा प्रयत्न असून, अधिकारीवर्गाकडून विरोधकांना जाणीवपूर्वक त्रास दिला जात आहे. 'थोड्याच महिन्यांत सत्ता बदलणार असून त्रास देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल,' असा इशारा आदित्य ठाकरे यांनी दिला आहे, जो आगामी राजकीय संघर्षाची चाहूल देणारा आहे. दुसरीकडे, कायदा आणि सुव्यवस्था राखणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी असते. सण-उत्सवांच्या काळात गर्दीचे व्यवस्थापन करणे आणि अनुचित प्रकार टाळण्यासाठी सुरक्षा यंत्रणांना कडक पावले उचलणे भाग पडत असते. मात्र, आंदोलने आणि दडपशाही यांच्या मधील सीमारेषा अतिशय पातळ असते. विद्यार्थ्यांच्या आणि तरुणांच्या ज्वलंत प्रश्नांवर केवळ पोलीस बळाचा वापर करून आवाज दाबणे लोकशाहीच्या हितसंबंधांना बाधक ठरू शकते. राजकीय आखाड्यात आरोप-प्रत्यारोपांच्या फेऱ्या झडत असल्या तरी, या संपूर्ण संघर्षात विद्यार्थ्यांचे आणि सर्वसामान्यांचे हित बाजूला पडणार नाही, याची दक्षता सर्वपक्षीय नेत्यांनी आणि प्रशासनाने घेणे गरजेचे आहे.

बेकायदेशीर गर्भपात प्रकरणात डॉ. नरगिस शेख यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला

माजलगाव (विशेष प्रतिनिधी) : अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचारातून राहिलेला गर्भ बेकायदेशीरपणे उतरवणे, पोलिसांना माहिती न देणे आणि पोक्सो (POCSO) कायद्याचे उल्लंघन करणे यांसारख्या गंभीर आरोपांखाली अडकलेल्या डॉ. नरगिस जावेद शेख यांचा अटकपूर्व जामीन अर्ज माजलगाव येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश डॉ. यु. जे. मोरे यांनी फेटाळून लावला आहे. या प्रकरणाची सुनावणी करताना न्यायालयाने बीड जिल्ह्यातील घटत्या स्त्री-पुरुष प्रमाणावर गंभीर चिंता व्यक्त केली आहे.

काय आहे प्रकरण?

अर्जातील माहितीनुसार, सुमारे दोन महिन्यांपूर्वी अल्पवयीन पीडितेला पोटदुखीचा त्रास होत असल्याने तिच्या पालकांनी तिला डॉक्टरांकडे नेले होते. तेथे तपासणीअंती ती गर्भवती असल्याचे उघड झाले. यानंतर पीडितेच्या नातेवाईकांना फुले नगर, माजलगाव येथील 'नर्गिस हॉस्पिटल'च्या 'आयुष डॉक्टर' (AYUSH Doctor - नोंदणी क्र. 41837) डॉ. नरगिस जावेद शेख यांच्याकडे पाठवण्यात आले.

डॉ. नरगिस यांनी गर्भपातासाठी १५ हजार रुपयांची मागणी केली तसेच देशपांडे हॉस्पिटलमध्ये सोनोग्राफी करण्यास सांगितले. देशपांडे हॉस्पिटलने या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून तात्काळ पोलिसांना मेडीको-लीगल केस (MLC) अंतर्गत माहिती दिली. मात्र, डॉ. नरगिस शेख यांनी पोलिसांना कोणतीही पूर्वकल्पना न देता १५ हजार रुपये घेऊन पीडित मुलीला गर्भपाताच्या गोळ्या दिल्या. या औषधोपचारानंतर मुलीला तीव्र रक्तस्राव आणि पोटदुखीचा त्रास सुरू झाला होता.

फरार आरोपी डॉक्टरांवर न्यायालयाचे ताशेरे!!

डॉ. नरगिस शेख या आधीपासूनच फरार (Absconding) असून, पोलीस तपास अधिकाऱ्यांनी (I.O.) त्यांना अटक करण्यासाठी पुरेशी तत्परता दाखवली नाही, याबद्दल न्यायालयाने खेद व्यक्त केला. उच्च न्यायालय आणि जिल्हा न्यायालयाने पूर्वी अर्ज फेटाळल्यानंतरही त्या तपासाला सहकार्य न करता फरार राहिल्या. "प्रतिष्ठित डॉक्टर असल्याचे सांगून फरार राहणे आणि चार्जशीट दाखल झाल्यानंतर आपोआप परिस्थिती बदलते असे मानणे चुकीचे आहे," असे स्पष्ट करत न्यायालयाने सर्वोच्च न्यायालयाच्या 'जी. आर. आनंदा बाबू विरुद्ध स्टेट ऑफ तमिळनाडू (2021)' या न्यायनिर्णयाचा दाखला दिला.

बीडमधील घटत्या स्त्री-पुरुष प्रमाणावर न्यायालयाची तीव्र चिंता!!

सुनावणीदरम्यान सत्र न्यायालयाने बीड जिल्ह्यातील बाल लिंग गुणोत्तराच्या (Child Sex Ratio) भीषण परिस्थितीवर चिंता व्यक्त केली. २०१२ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात १००० मुलांमागे ९१६ मुली असे प्रमाण होते. २०१९ ते २०२१ दरम्यान हे प्रमाण घटून दर १००० मुलांमागे केवळ ८३८ मुली इतके चिंताजनक पातळीवर खाली आले आहे. न्यायालयाने नमूद केले की, बीड जिल्ह्यात अवैध गर्भपात आणि पोक्सो अंतर्गत गुन्ह्यांचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. काही डॉक्टर कायद्याची तमा न बाळगता गुन्हेगारांना मदत करत आहेत. ही परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी पोलीस प्रशासन, जिल्हा प्रशासन आणि महिला व बालविकास विभागाने अत्यंत कठोर आणि सतर्कतेने पावले उचलणे गरजेचे आहे. पोक्सो (POCSO) कायद्यांतर्गत वैद्यकीय व्यावसायिकांचे कर्तव्य - न्यायालयाने पोक्सो कायदा २०१२ मधील कलम १९ व २१ तसेच भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ६४ व ९१ चा संदर्भ दिला.

कलम १९ अन्वये : अल्पवयीन मुलगी गर्भवती असल्याचे किंवा तिच्यावर लैंगिक अत्याचार झाल्याचे समजताच पोलिसांना किंवा विशेष जुवेनाईल पोलीस युनिटला माहिती देणे प्रत्येक डॉक्टरांवर बंधनकारक आहे.

कलम २१ अन्वये : अशी माहिती न देणे हा कायद्याने शिस्तीचा व शिक्षेस पात्र गुन्हा आहे.

"मी फक्त वैद्यकीय उपचार करत होते, त्यामुळे पोलिसांना कळवण्याची माझी जबाबदारी नव्हती," असे सांगून कोणतेही डॉक्टर पोक्सो कायद्याच्या अंमलबजावणीपासून पळ काढू शकत नाहीत, असे न्यायालयाने ठणकावून सांगितले.

आरोपी डॉक्टरवर व इतर आरोपीवर BNS कलम ६४, ९१ आणि पोक्सो कायदा कलम ४, ६, २१ अंतर्गत अत्यंत गंभीर आरोप आहेत. त्या एक जबाबदार वैद्यकीय व्यावसायिक असताना त्यांनी कायदेशीर कर्तव्य पार पाडण्याऐवजी बेकायदेशीरपणे गर्भपाताच्या गोळ्या दिल्या. या प्रकरणात आरोपीची कोठडीत चौकशी (Custodial Interrogation) अत्यंत आवश्यक आहे.

सलग दुसऱ्या दिवशीही केंद्रीय पथकाने अनुभवली दुष्काळाची दहाकता

पाऊस हरवला, पाणी आटले ; शेतकऱ्यांच्या डोळ्यांत उरली मदतीची आशा !; मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात 15 ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी :-*कुठे सोयाबीनची वाढ खुंटलेली, कुठे हातातोंडाशी आलेले पीक वाया गेलेले, तर कुठे पाझर तलाव कोरडे पडल्याने पाण्याचा प्रश्न गंभीर झालेला. जनावरांच्या चाऱ्याची चिंता, फळबागा जगविण्याची धडपड आणि पिण्याच्या पाण्यासाठीची प्रतीक्षा... बीड जिल्ह्यातील दुष्काळाचे हे वास्तव केंद्रीय आंतरमंत्रालयीन पथकाच्या प्रत्यक्ष पाहणीतून समोर आले. शनिवार, दि. १० ऑक्टोबर रोजी पथकाने जिल्ह्यातील १५ ठिकाणी थांबून शेती, जलस्रोत व पाणीपुरवठ्याची स्थिती जाणून घेतली.शेकडो हेक्टर जमिनीतील दहाकता पाहून केंद्रीय पथकही हेलावून गेले.

केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण विभागाचे संयुक्त सचिव तथा पथकप्रमुख मुक्तानंद अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली हा दौरा झाला. या दौऱ्यात राज्याचे कृषी सचिव परिमल सिंग, महालनोबिस राष्ट्रीय पीक पूर्वानुमान केंद्राचे उपसंचालक सुनील कुमार दुबे, जिल्हाधिकारी डॉ. विवेक जॉन्सन,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान यांच्यासह संबंधित अधिकारी सहभागी झाले होते. प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी, शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेणे आणि नुकसानीची वस्तुस्थिती समजून घेण्यावर पथकाने भर दिला.

अपेक्षित उत्पादन ७ ते ८ क्विंटल ;हाती केवळ ५० किलोची शक्यता

बीड तालुक्यातील मोरगाव येथे बाबासाहेब चोखामार यांच्या दोन एकरांतील सोयाबीन पिकाची पाहणी करताना पावसाच्या खंडामुळे शेतीचे झालेले नुकसान स्पष्ट झाले. सर्वसाधारण परिस्थितीत एकरी सात ते आठ क्विंटल उत्पादनाची अपेक्षा असताना यंदा एकरी जेमतेम ५० किलो सोयाबीन मिळण्याची शक्यता असल्याची माहिती कृषी सहाय्यकांनी पथकाला दिली. फुलोऱ्याच्या अवस्थेत पाऊस न झाल्याने पिकाची वाढ खुंटली. मोरगावमधील सुमारे १,४०० शेतकऱ्यांपैकी जवळपास ७० टक्के शेतकऱ्यांच्या पिकांचे ३३ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान झाल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

पथकाने किरण भास्कर केकाण शेताचीही पाहणी केली. याच परिसरातील खंडाळा येथे शेतकऱ्यांनी विहिरी कोरड्या पडल्याची आणि सोयाबीनची वाढ तीन फुटांपर्यंतही न झाल्याची व्यथा मांडली. पंचनाम्यांची पडताळणी करताना पिकांची प्रत्यक्ष स्थिती, छायाचित्रे आणि नुकसानीच्या नोंदींची माहिती पथकाने घेतली. सरपंच श्रीधर गिते यांच्याशी संवाद साधून त्यांच्या शेतीतील पीकपद्धतीही जाणून घेतली.

६५ दिवस पाऊस नाही ; सोयाबीनसह फळबागाही संकटात

पाटोदा तालुक्यातील वैद्यकिन्ही व सोनेगाव येथे गेल्या ६५ दिवसांपासून पाऊस नसल्याने शेती आणि पाणीपुरवठ्यावर गंभीर परिणाम झाल्याचे समोर आले. वैद्यकिन्ही येथे देवीदास भानदास यांच्या दोन हेक्टर क्षेत्रातील सोयाबीन पिकाची पाहणी करण्यात आली. पावसाअभावी पीक वाया गेल्याने सलग दुसऱ्या वर्षी शेतकऱ्यांना नुकसान सहन करावे लागत असल्याची व्यथा त्यांनी मांडली.

जनावरांच्या चाऱ्याचा दर प्रतिटन चार हजार रुपयांपर्यंत पोहोचल्याने पशुपालकांची चिंता वाढली आहे. जुन्या विहिरीतून दिवसाला केवळ तीन ते साडेतीन तास पाणी मिळत असल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली. गावातील सुमारे १,१०० हेक्टर क्षेत्रापैकी ९५० हेक्टरवर सोयाबीनची लागवड असल्याने पावसाच्या दीर्घ खंडाचा मोठा फटका शेतीला बसला आहे.

सोनेगाव येथे सोयाबीनसह तूर, डाळिंब, मोसंबी व द्राक्षांच्या बागांनाही पाणीटंचाईचा फटका बसत असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. शेतकरी अशोक चौरे यांनी शेतीपिकांसाठी हेक्टरी ५० हजार रुपये, तर फळबागांसाठी हेक्टरी दोन लाख रुपये मदत देण्याची मागणी केली. पाणीटंचाईमुळे वर्षभर जपलेल्या फळबागा सुकण्याच्या मार्गावर असल्याने वेळेत मदत मिळण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

सोयाबीन वाळवत असलेल्या महिलेला बघून थांबला ताफा

दाशखेड येथे शेतात सोयाबीन वाळवत असलेल्या रेखा जयंत कोकाटे यांच्याशी केंद्रीय पथकाने थांबून संवाद साधला. गेल्या वर्षी ३० पोती सोयाबीन झाले होते; यंदा दीड ते दोन एकरांत जेमतेम ४० किलो उत्पादन मिळण्याची शक्यता असल्याचे त्यांनी सांगितले. चांगली काळी जमीन असूनही पावसाअभावी पीक अपेक्षेप्रमाणे आले नाही. हलक्या जमिनीतील पीक पूर्णपणे वाया गेले, तर चांगल्या जमिनीतील सोयाबीनचेही उत्पादन घटले आहे. शेताजवळील नदी कोरडी पडल्याने सिंचनासाठी पर्यायी स्रोत उपलब्ध नसल्याचेही त्यांनी सांगितले.

दाशखेड येथेच सुधाकर नवनाथ ठोंबरे यांनी तीन एकरांतील सोयाबीनसाठी ५४ हजार रुपये खर्च करूनही दीड ते दोन क्विंटल उत्पादनाची शक्यता असल्याचे सांगितले. त्यातून सुमारे नऊ ते दहा हजार रुपयांचे उत्पन्न मिळण्याची अपेक्षा आहे.

बबनराव ठोंबरे यांच्या अडीच एकरांतील सोयाबीनमधून केवळ ६० ते ७० किलो उत्पादन मिळण्याची शक्यता आहे. पिकासाठी केलेला खर्च आणि अपेक्षित उत्पन्न यातील मोठी तफावत शेतकऱ्यांसमोरील आर्थिक संकटाची तीव्रता दर्शवते.

कांदा, झेंडू, मका उत्पादकांनाही फटका

वैजाळा येथे पथकाने कांदा, झेंडू व मका उत्पादक शेतकऱ्यांशी संवाद साधला. कांदा उत्पादक बंकट शेवराव येडे यांनी पाण्याच्या टंचाईमुळे कांद्याची लागवड दहा एकरांवरून यंदा केवळ एक एकरावर आणावी लागल्याचे सांगितले. शेततळ्यातही पाणी नसल्याने पिकाच्या भवितव्याची चिंता वाढली आहे.

झेंडू उत्पादक पांडुरंग बाबासाहेब मस्के यांनी वाढत्या तापमानामुळे फुलांचा आकार लहान होत असल्याची माहिती दिली. मका उत्पादक काकासाहेब नामदेव येडे यांनीही पावसाअभावी पिकांच्या वाढीवर परिणाम झाल्याचे सांगितले. पाण्याअभावी केवळ पारंपरिक पिकेच नव्हे, तर भाजीपाला व फुलशेतीसारख्या पर्यायी उत्पन्नाच्या साधनांनाही फटका बसत असल्याचे या पाहणीतून स्पष्ट झाले.

जनावरांच्या चाऱ्याची चिंता ; पशुधन जगविण्याचे आव्हान

पाटोदा तालुक्यातील बेडूकवाडी येथे वैभव अंकुश शिंदे व अंकुश परसराम शिंदे या शेतकरी बंधूंनी जनावरांच्या चाऱ्याची समस्या मांडली. सध्या घरचा ज्वारीचा कडबा आणि नेपियर गवत उपलब्ध असले, तरी हा साठा जेमतेम १५ दिवस पुरेल, अशी स्थिती आहे. बाहेरून चारा खरेदी करायचा झाल्यास प्रतिटन ११ हजार रुपये खर्च येतो. दररोज सुमारे १३० लिटर दूध संकलन करणाऱ्या या शेतकऱ्यांसाठी चाऱ्याचा वाढता खर्च मोठे आव्हान ठरत आहे. चारा संपल्यानंतर पशुधन कसे जगवायचे, हा प्रश्न त्यांच्यासमोर आहे. चारा टंचाई वाढल्यास शासनाने चारा डेपो सुरू करून मदत करावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

शेतीपिकांबरोबरच पाणीटंचाईच्या स्थितीची पाहणी करताना पथकाने पाली येथील स्वयंचलित हवामान केंद्र व बिंदुसरा तलावाला भेट दिली. महावेध यंत्रणेद्वारे तापमान, आर्द्रता, वाऱ्याचा वेग व दिशा आणि पर्जन्यमानाची दर दहा मिनिटांनी नोंद घेतली जाते. जिल्ह्यातील ७९ महसूल मंडळांमध्ये स्वयंचलित हवामान केंद्रे कार्यरत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

बीड शहरालगतच्या बिंदुसरा तलावातील उपयुक्त पाणीसाठा ३० जून रोजी १७ टक्के होता; तो आता पाच टक्क्यांवर आला आहे. मागील वर्षी याच कालावधीत तलावात १०० टक्के पाणीसाठा होता. बीड शहराला दररोज सुमारे ३८ दशलक्ष लिटर पाण्याची गरज असून, त्यापैकी २८ दशलक्ष लिटर पाणी माजलगाव धरणातून उपलब्ध होते. उर्वरित पाण्यासाठी बिंदुसरा तलावावर अवलंबून राहावे लागते. यंदा उपलब्ध पाणीसाठा पिण्याच्या पाण्यासाठी राखून ठेवण्याचे नियोजन असल्याची माहिती पथकाला देण्यात आली.

मोरगाव येथील दराडे वस्तीवरील पाझर तलावात पाणीसाठा शून्य असल्याचे पाहणीत दिसून आले. प्रभू दराडे यांच्या विहिरीची पाहणी करून भूजल पातळी व पाणी उपलब्धतेची माहिती घेण्यात आली. खंडाळा तलावाचीही पाहणी करण्यात आली.

डॉ. नितीन राऊत : संघर्षातून उभे राहिलेले नेतृत्व, सामाजिक न्यायाचा धगधगता आवाज!

सत्तेची खुर्ची हे नेतृत्वाचे अंतिम ध्येय नसते, तर समाजातील शेवटच्या माणसाच्या आयुष्यात सन्मान, संधी आणि न्यायाचा प्रकाश पोहोचवणे हेच खऱ्या नेतृत्वाचे मर्म असते. डॉ. नितीन राऊत यांच्या राजकीय आणि सामाजिक प्रवासाकडे पाहताना हा विचार प्रकर्षाने जाणवतो.

राजकारणात पदे मिळविणारे अनेक असतात, परंतु पदाच्या पलीकडे जाऊन सामाजिक प्रश्नांशी नाते जोडणारे नेतृत्व तुलनेने कमी दिसते. राजकारणाचा अर्थ केवळ निवडणुका जिंकणे, सत्तेची समीकरणे जुळविणे आणि पदांची प्रतिष्ठा मिरविणे एवढाच उरला, तर लोकशाहीच्या आत्म्यालाच धक्का बसतो. लोकशाहीचे खरे सामर्थ्य वंचितांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यात, अन्यायाविरुद्ध उभे राहण्यात आणि संविधानाने दिलेल्या समानतेच्या मूल्यांना प्रत्यक्ष कृतीत उतरविण्यात आहे. महाराष्ट्राचे माजी मंत्री डॉ. नितीन राऊत यांचा राजकीय आणि सामाजिक प्रवास याच व्यापक संदर्भात समजून घेण्याची गरज आहे. ९ ऑक्टोबर हा त्यांच्या वाढदिवसाचा दिवस. हा दिवस केवळ शुभेच्छांचा औपचारिक सोहळा न राहता, त्यांच्या सार्वजनिक जीवनातील वाटचालीचा, सामाजिक बांधिलकीचा आणि विदर्भाच्या प्रश्नांवरील भूमिकेचा आढावा घेण्याची संधी ठरावी, कारण एखाद्या नेत्याचा गौरव त्याच्या पदांच्या यादीने होत नाही, तर त्याने कोणासाठी आवाज उठविला, कोणत्या प्रश्नांना प्राधान्य दिले आणि समाजाप्रती आपली जबाबदारी किती प्रामाणिकपणे पार पाडली, यावर त्याचे सार्वजनिक मूल्यमापन व्हायला हवे.

नागपूरच्या भूमीतून पुढे आलेले डॉ. नितीन राऊत हे काँग्रेसच्या राजकारणातील परिचित नाव आहे. त्यांच्या वडिलांचे नाव काशिनाथजी राऊत असून ते स्वातंत्र्यसैनिक होते. घरातून मिळालेला सार्वजनिक जीवनाचा वारसा, नागपूरच्या सामाजिक चळवळींचे वातावरण आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी घडविलेली सामाजिक जाणीव, या व्यापक पार्श्वभूमीत त्यांच्या प्रवासाकडे पाहता येते. डॉ. राऊत यांच्या राजकीय कारकिर्दीचा उल्लेख करताना केवळ मंत्रीपदे किंवा पक्षातील जबाबदाऱ्या मांडणे पुरेसे ठरणार नाही. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीचे उपाध्यक्ष, अखिल भारतीय काँग्रेस समितीचे सदस्य आणि पक्षाच्या विविध संघटनात्मक जबाबदाऱ्या त्यांनी सांभाळल्या आहेत. उत्तर नागपूर या अनुसूचित जातींसाठी राखीव विधानसभा मतदारसंघातून त्यांनी प्रतिनिधित्व केले. २००९ मध्ये सलग तिसऱ्यांदा निवडून आल्याची नोंद त्यांच्या राजकीय कारकिर्दीतील जनाधाराचे महत्त्व अधोरेखित करते. मात्र, कोणत्याही लोकप्रतिनिधीची खरी कसोटी ही त्याच्या निवडणुकीतील विजयापेक्षा जनतेच्या प्रश्नांवरील त्याच्या भूमिकेत असते. समाजातील दुर्बल घटकांना न्याय मिळावा, अनुसूचित जाती-जमातींच्या अनुशेषाचा प्रश्न सुटावा आणि विकासाच्या प्रक्रियेत विदर्भाला योग्य वाटा मिळावा, या मुद्द्यांवर डॉ. राऊत यांनी विविध प्रसंगी भूमिका मांडली. या भूमिकांचे मूल्यमापन करताना त्यातून प्रत्यक्षात किती बदल घडले, कोणते प्रश्न मार्गी लागले आणि कोणते अद्याप प्रलंबित आहेत, याचाही प्रामाणिक हिशेब आवश्यक आहे.

विदर्भाचा विकास हा महाराष्ट्राच्या राजकारणातील अनेक दशकांपासूनचा ज्वलंत विषय आहे. नैसर्गिक साधनसंपत्ती, शेती, उद्योग, रोजगार आणि शिक्षणाच्या संधी असूनही प्रादेशिक असमतोलाची चर्चा वारंवार पुढे येते. विदर्भाच्या अनुशेषाचा प्रश्न केवळ आर्थिक आकडेवारीचा नाही; तो या प्रदेशातील तरुणांच्या भविष्याचा, शेतकऱ्यांच्या जगण्याचा आणि सर्वसामान्यांच्या विकासाच्या अधिकाराचा प्रश्न आहे. डॉ. नितीन राऊत यांनी विदर्भातील विकासाच्या असमतोलाबाबत अहवाल सादर करण्यासह अनुशेष भरून काढण्याच्या मुद्द्याला राजकीय व्यासपीठावर स्थान दिले. स्वतंत्र विदर्भाच्या मागणीला पाठिंबा देणाऱ्या त्यांच्या भूमिकेचाही त्यांच्या राजकीय प्रवासात उल्लेख आढळतो. या भूमिकांशी सहमत असो वा असहमत, विदर्भाच्या प्रश्नांना राज्याच्या मुख्य राजकीय चर्चेत स्थान मिळणे महत्त्वाचे आहे. परंतु आजही मूलभूत प्रश्न कायम आहेत. विदर्भातील प्रत्येक तरुणाला स्थानिक पातळीवर रोजगाराची संधी मिळते का? शेतकऱ्यांना सुरक्षित आणि शाश्वत उत्पन्नाची हमी आहे का? सरकारी सेवांमधील अनुशेष भरून काढण्यासाठी प्रभावी उपाययोजना झाल्या आहेत का? या प्रश्नांची उत्तरे केवळ वाढदिवसाच्या शुभेच्छांमध्ये मिळणार नाहीत. त्यासाठी धोरणात्मक सातत्य, प्रशासकीय उत्तरदायित्व आणि राजकीय इच्छाशक्ती आवश्यक आहे. खरे नेतृत्व तेच, जे प्रादेशिक असमतोलाला निवडणुकीतील मुद्दा बनविण्यापुरते मर्यादित न ठेवता त्याच्या निराकरणासाठी सातत्याने प्रयत्न करते. विदर्भाचा विकास हा कोणत्याही एका पक्षाचा किंवा नेत्याचा विषय नसून संपूर्ण राज्याच्या न्याय्य विकासाचा निकष आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजासमोर समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय यांची मूल्यव्यवस्था ठेवली. या मूल्यांचे महत्त्व केवळ संविधानाच्या प्रस्तावनेपुरते नाही, ते समाजाच्या दैनंदिन व्यवहारात उतरले पाहिजे. जातीय विषमता, सामाजिक बहिष्कार, शिक्षणातील असमानता आणि रोजगाराच्या संधींमधील दरी दूर केल्याशिवाय सामाजिक न्यायाचे स्वप्न पूर्ण होऊ शकत नाही. डॉ. राऊत यांनी अनुसूचित जाती-जमातींचा अनुशेष, आरक्षणविषयक प्रश्न आणि सामाजिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या प्रतिनिधित्वाचे मुद्दे विविध व्यासपीठांवर मांडले. बौद्ध विवाह व वारसाहक्क कायद्याशी संबंधित विधेयकाची मांडणी करण्याचाही त्यांच्या कार्यवृत्तात उल्लेख आहे. सामाजिक प्रश्नांकडे कायदेशीर आणि संस्थात्मक दृष्टिकोनातून पाहण्याचा हा प्रयत्न महत्त्वाचा मानता येईल.

खैरलांजी हत्याकांडासारख्या अमानुष घटनेच्या चौकशीसाठी पुढाकार घेण्याची नोंदही त्यांच्या सार्वजनिक कार्याच्या संदर्भात उल्लेखनीय आहे. अशा घटना समाजाला केवळ हादरवून सोडत नाहीत, तर कायद्याचे राज्य, सामाजिक संवेदनशीलता आणि प्रशासनाच्या जबाबदारीवरही गंभीर प्रश्न उपस्थित करतात. मात्र, सामाजिक न्यायाच्या लढाईत कोणत्याही नेत्याची भूमिका अंतिम मानता येत नाही. आरक्षणाची प्रभावी अंमलबजावणी, गुणवत्तापूर्ण शिक्षण, आर्थिक स्वावलंबन, जातीय अत्याचारांना प्रतिबंध आणि वंचितांना निर्णयप्रक्रियेत प्रतिनिधित्व या आघाड्यांवर सातत्यपूर्ण काम करणे गरजेचे आहे. सामाजिक न्याय हा भाषणातील लोकप्रिय शब्द नसून शासनाच्या प्रत्येक निर्णयातून दिसणारा व्यवहार असला पाहिजे.

राजकारणाची खरी ओळख संकटाच्या काळात होते. नैसर्गिक आपत्ती, पूर, दंगली किंवा अन्य मानवी संकटे कोसळली असताना पीडितांच्या मदतीला धावून जाणे ही लोकप्रतिनिधीची केवळ औपचारिक जबाबदारी नसते, तर ती माणुसकीची कसोटी असते. डॉ. राऊत यांच्या सामाजिक कार्याच्या नोंदींमध्ये नागपूर जिल्ह्यातील पूरग्रस्तांना मदत करणे आणि जातीय दंगलीतील पीडितांना अन्नधान्य, औषधे व कपड्यांचे साहाय्य देणे अशा उपक्रमांचा उल्लेख आहे. नागपूरच्या दीक्षाभूमीवर धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त देशभरातून लाखो अनुयायी येतात. या अनुयायांना आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या कामात 'संकल्प' या संस्थेच्या माध्यमातून योगदान दिल्याची नोंदही त्यांच्या कार्यपरिचयात आहे. दीक्षाभूमी ही केवळ वास्तू नाही, तर ती आत्मसन्मानाची, परिवर्तनाची आणि मानवी मुक्तीच्या विचारांची प्रेरणाभूमी आहे. येथे येणाऱ्या अनुयायांची व्यवस्था करणे म्हणजे सामाजिक बांधिलकीला कृतीची जोड देणे होय.

डॉ. राऊत यांनी गृह, कारागृह, राज्य उत्पादन शुल्क, कामगार तसेच पशुसंवर्धन, दुग्धविकास आणि मत्स्यव्यवसाय, जलसंधारण व रोजगार हमी योजना, ऊर्जा यांसारख्या विभागांमध्ये मंत्रिपदाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या. या विभागांचा संबंध सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेपासून ग्रामीण अर्थव्यवस्थेपर्यंत अनेक महत्त्वाच्या क्षेत्रांशी आहे. त्यामुळे त्यांच्या सार्वजनिक कार्याचे मूल्यमापन करताना त्यांनी सांभाळलेल्या जबाबदाऱ्यांबरोबरच संबंधित क्षेत्रांतील धोरणात्मक निर्णय आणि प्रत्यक्ष परिणाम यांचाही विचार व्हायला हवा. नेत्याचा सन्मान करताना त्याच्या कामातील सकारात्मक बाजू अधोरेखित करणे आवश्यक आहे; पण त्याच वेळी प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्यही जपले पाहिजे. कारण लोकशाहीत चिकित्सक दृष्टी ही विरोधाची नव्हे, तर उत्तरदायित्वाची खूण असते.

आजच्या राजकारणात वैचारिक निष्ठेपेक्षा प्रतिमानिर्मितीला अधिक महत्त्व दिले जात असल्याची टीका वारंवार होते. समाजमाध्यमांवरील लोकप्रियता, मोठ्या सभा आणि घोषणांचा गजर यांत प्रत्यक्ष जनहिताचे प्रश्न मागे पडू नयेत. डॉ. नितीन राऊत यांच्यासारख्या दीर्घ राजकीय अनुभव असलेल्या नेत्यांसमोरही आज हेच आव्हान आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार मांडणे म्हणजे त्यांच्या प्रतिमेला अभिवादन करणे एवढेच नव्हे. शिक्षण, संघटन, संघर्ष, घटनात्मक मार्ग आणि विवेकनिष्ठ सामाजिक परिवर्तन या मूल्यांना राजकीय व्यवहारात स्थान देणे अधिक महत्त्वाचे आहे. वंचित समाजातील मुलाला दर्जेदार शिक्षण, युवकाला रोजगार, महिलेला सुरक्षितता आणि शेतकऱ्याला सन्मानाचे जीवन मिळवून देणाऱ्या धोरणांतूनच परिवर्तनवादी राजकारणाची विश्वासार्हता सिद्ध होते. राजकीय नेतृत्व कितीही अनुभवी असले, तरी काळानुसार त्याने स्वतःचे आत्मपरीक्षण केले पाहिजे. नव्या पिढीशी संवाद, संघटनात्मक पारदर्शकता, स्थानिक प्रश्नांवर सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि कार्यकर्त्यांना विचारांची दिशा देणे या बाबी महत्त्वाच्या आहेत. जुन्या संघर्षांच्या आठवणी प्रेरणा देतात, परंतु वर्तमानातील प्रश्न सोडविण्यासाठी नव्या उपायांचीही आवश्यकता असते. डॉ. राऊत यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्याविषयी सद्भावना व्यक्त करताना हीच अपेक्षा रास्त ठरते. त्यांचा अनुभव अधिक व्यापक सामाजिक परिवर्तनासाठी उपयोगात यावा, विदर्भाच्या प्रश्नांवरील भूमिका अधिक परिणामकारक व्हावी आणि संविधाननिष्ठ राजकारणाला बळ मिळावे.

९ ऑक्टोबर हा डॉ. नितीन राऊत यांच्यासाठी आनंदाचा आणि त्यांच्या हितचिंतकांसाठी शुभेच्छांचा दिवस आहे. मात्र, सार्वजनिक जीवनातील व्यक्तीचा वाढदिवस हा केवळ अभिनंदनपर संदेश, पुष्पगुच्छ आणि सत्कारापुरता मर्यादित राहू नये. तो जनतेशी असलेल्या नात्याचे नूतनीकरण करण्याचा दिवस ठरावा. डॉ. राऊत यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा देताना त्यांच्या पुढील वाटचालीत सामाजिक न्यायाची बांधिलकी अधिक दृढ व्हावी, विदर्भाच्या विकासासाठीचे प्रयत्न अधिक परिणामकारक व्हावेत आणि तरुण पिढीला संविधानवादी, विवेकनिष्ठ व लोककल्याणकारी राजकारणाची प्रेरणा मिळावी, अशी अपेक्षा आहे. कारण इतिहासात नाव नोंदविण्यासाठी पद पुरेसे असते, पण जनतेच्या मनात स्थान निर्माण करण्यासाठी विश्वास कमवावा लागतो. सत्ता बदलते, पदे येतात-जातात आणि राजकीय समीकरणेही बदलतात, परंतु अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची भूमिका आणि माणसाच्या सन्मानासाठी केलेले काम दीर्घकाळ स्मरणात राहते. सामाजिक न्यायाचा विचार अधिक बळकट होवो, विदर्भाच्या विकासाला नवी दिशा मिळो आणि लोकशाहीत

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

अजिंठा घाटात पर्यटनाची अंत्ययात्रा : थर्ड क्लास कारभारामुळे महामार्ग बनला मृत्यूचा सापळा

अधिकारी एसीत झोपेत, पोलीस घामाघूम आणि पर्यटक वाऱ्यावर; शासनाचे खिसे भरतायत पण स्थानिक गरिबांवर मात्र उपाशी मरण्याची वेळ

फर्दापूर प्रतिनिधी : जळगाव छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील अजिंठा घाट आता पर्यटनस्थळ राहिला नसून प्रवाशांसाठी नरकयातनांचा अड्डा बनला आहे शनिवारी सलग तीन तास झालेल्या भयंकर ट्रॅफिक जॅमने हजारो वाहने अशी काही अडकली की जगप्रसिद्ध अजिंठा लेणी पाहण्यासाठी आलेल्या देश विदेशातील पर्यटकांना अक्षरश रडकुंडीला आणले वारंवार होणाऱ्या या जीवघेण्या कोंडीमुळे अजिंठा लेणीकडे येणाऱ्या पर्यटकांची संख्या आधीच १ टक्क्यावर घसरली आहे मात्र निर्ढावलेल्या प्रशासनाने वेळीच डोळे उघडले नाहीत तर हे पर्यटन लवकरच झिरो ०% टक्क्यावर गेल्याशिवाय राहणार नाही असा संतापाचा स्फोट आता स्थानिक नागरिकांमधून होत आहे

नेमके काय घडले

शनिवारी सकाळी ९ वाजेच्या सुमारास घाटातील घोडी पटांगण येथे तब्बल तीन अवजड वाहने एकाच वेळी नादुरुस्त झाली घाटातील अरुंद रस्ता आणि त्यातच या अवाढव्य वाहनांनी रस्ता अडवल्याने महामार्गाची अक्षरश नाकेबंदी झाली बघता बघता वाहनांच्या कित्येक किलोमीटर लांबच लांब रांगा लागल्या भर उन्हात लहान मुले महिला आणि वृद्ध प्रवासी तासन्तास गाडीत कोंडले गेले होते आम्ही जागतिक वारसा पाहायला आलोय की या घाटात नरकयातना भोगायला असा संतप्त सवाल पर्यटक विचारत होते मात्र टोल वसुली करणारे आणि रस्ते दुरुस्तीचे ढोल बडवणारे प्रशासन या सगळ्याकडे डोळेझाक करत होते



पोलिसांची धावपळ प्रशासनाची कुंभकर्ण झोप

कोंडीची माहिती मिळताच फर्दापूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुधीर मोटे यांनी तात्काळ आपल्या कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली एकीकडे संबंधित विभागाचे अधिकारी आपल्या वातानुकूलित AC केबिनमध्ये झोपा काढत असताना सपोनि मोटे यांच्यासह पोलीस कर्मचारी फिरोज तडवी स्वप्निल चव्हाण दिपक घन भास्कर गव्हांडे संदीप बिरारे आणि मदतनीस यांनी भर उन्हात घामाच्या धारा गाळत जिवाचे रान केले अत्यंत शिताफीने लहान वाहने बाजूला करून त्यांनी एकेरी वाहतूक सुरू केली क्रेनच्या साहाय्याने वाहने बाजूला करून दुपारी १ वाजेपर्यंत पोलिसांनी रस्ता मोकळा केला पोलीस जर नसते तर रात्रीपर्यंत हा रस्ता मोकळा झाला नसता अशी उद्विग्न प्रतिक्रिया प्रवाशांनी दिली

शासन फक्त महसूल ओरबडणार गरिबांचे काय

अजिंठा घाटात कधी ३-४ तास तर कधी चक्क १४-१४ तास वाहतूक ठप्प होणे ही आता नित्याचीच डोकेदुखी झाली आहे या भयानक त्रासामुळे पर्यटकांनी लेणीकडे पाठ फिरवली आहे यावर स्थानिक व्यावसायिकांनी शासनावर जोरदार प्रहार केला आहे

शासनाला महसूल ओरबडण्यासाठी हजारो दरवाजे आहेत पण आमच्यासारख्या गरिबांचे पोट भरण्याचा एकमेव आधार ही अजिंठा लेणी आहे जर इथल्या थर्ड क्लास रस्त्यांमुळे पर्यटकच आले नाहीत तर इथल्या टॅक्सीचालक गाईड आणि छोट्या दुकानदारांनी काय आत्महत्या करायची का शासन आपल्या नाकर्तेपणाने आमच्या गरिबांच्या तोंडचा घास हिरावून घेत आहे असा टाहो स्थानिकांनी फोडला आहे

अजिंठा लेणीच्या नावावर लाखो करोडो रुपये छापणाऱ्या निर्ढावलेल्या प्रशासनाने आता तरी कुंभकर्णी झोपेतून जागे व्हावे अजिंठा घाटातील या वाहतूक कोंडीवर तातडीने कायमस्वरूपी तोडगा काढावा अन्यथा संतप्त स्थानिक नागरिक आणि व्यावसायिक रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडतील असा खणखणीत इशारा देण्यात आला आहे

वन्यप्राण्यांसाठी जंगलातील पाणवठ्यांवर पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी



दैनिक हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव, दि.११ ऑक्टोबर

सोयगाव तालुक्यातील सावरखेडा येथे (दि.९) रात्री १० वाजून २५ मिनिटांच्या सुमारास श्री हनुमान मंदिराजवळ अस्वलाचे दर्शन झाल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. गावकऱ्यांच्या निदर्शनास अस्वल येताच त्यांनी त्याला तेथून हाकलून लावले.

यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने जंगलातील वन्यप्राण्यांना पाणी व खाद्य उपलब्ध होत नसावे. त्यामुळे वन्यप्राणी मानवी वस्तीकडे वळत असल्याची शक्यता ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात आहे. हिवाळ्यातच उन्हाळ्यासारखी परिस्थिती निर्माण होत असल्याने वन्यप्राण्यांच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनत आहे.

जंगलातील पाणवठ्यांवर पाणी भरण्याची मागणी

वनविभागाने जंगलातील नैसर्गिक व कृत्रिम पाणवठ्यांमध्ये नियमित पाणी उपलब्ध करून द्यावे. तसेच वन्यप्राणी गावात येऊ नयेत आणि नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण होऊ नये, यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी दिपक सपकाळ यांनी केली आहे.

तलावातून अवैध पाणी उपसा :350 मोटारी जप्त!



बीड-दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर एकीकडे तलावातील पाणीसाठा पिण्यासाठी आरक्षित करण्यात आलेला आहे. तरीदेखील ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर शेतकरी तलावात मोटरी टाकून पाणी उपसा करत असल्याचे दिसते. याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यानंतर माजलगाव तालुक्यात दोन ठिकाणी प्रशासनाने धडक कारवाई करत 350 मोटरी आणि 50 सोलर पॅनल जप्त केले.

माजलगाव जलाशयातून मंगरूळ १ आणि मंगरूळ २ या ठिकाणी होत असलेल्या अवैध पाणी उपशाविरोधात १० ऑक्टोबर २०२६ रोजी प्रशासनाच्या संयुक्त पथकाकडून मोठी धडक कारवाई करण्यात आली. या मोहिमेत अवैध पाणी उपसा करणाऱ्या तीन वेगवेगळ्या ठिकाणांहून तब्बल ३५० पाण्याच्या मोटारी आणि ५० सोलर पॅनेल काढून टाकण्यात आले आहेत. प्रशासनाच्या या आक्रमक पावलामुळे अवैध पाणी उपसा करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

IMG 20261011 WA0032

या कारवाईदरम्यान संबंधित शेतकरी आणि ग्रामस्थांना प्रशासनाकडून सक्त ताकीद देण्यात आली असून, त्यांच्याकडून यापुढे जलाशयातून कोणत्याही प्रकारचा अवैध पाणी उपसा करणार नसल्याचे लेखी आश्वासन लिहून घेण्यात आले आहे. पाण्याचे महत्व आणि धरणातील पाणीसाठा लक्षात घेता ही कारवाई केवळ एका दिवसापुरती मर्यादित राहणार नाही. भविष्यात पुन्हा अवैध पाणी उपसा सुरू होऊ नये यासाठी यापुढेही अशीच सातत्याने कारवाई चालू राहील, असा स्पष्ट इशारा पाटबंधारे विभागाकडून देण्यात आला आहे.

ही व्यापक कारवाई माजलगाव धरण प्रशासन, पाटबंधारे विभाग, महसूल विभाग, पोलीस दल आणि विद्युत वितरण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आली. या धडक मोहिमेत पाटबंधारे विभागाचे उपअभियंता शितल माने, एस. एस. शेख, मधुकर जाधव, महसूल विभागाचे मंडळ अधिकारी हंगे, पोलीस पाटील अल्ताफ शेख, पोलीस दलाचे उपनिरीक्षक (पीएसआय), विद्युत वितरण विभागाचे एस. बी. चव्हाण यांच्यासह ग्रामसेवक तसेच सर्व संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने आणि सक्रियपणे सहभागी झाले होते.

नालंदा बुद्ध विहार पेण तळे येथे वर्षावास धम्म प्रवचन मालिका कार्यक्रम उत्साहात साजरा

आर्य अष्टांगिक मार्ग जीवन जगण्याची कला : प्रवचनकार रुपेश गमरे





माणगाव रायगड* - *बौद्धजन पंचायत समिती तालुका शाखा माणगाव यांच्या आदेशावरून शाखा क्रमांक 11 नालंदा बुद्ध विहार पेण / तळे तालुका माणगाव जिल्हा रायगड येथे रविवार दिनांक 11 ऑक्टोबर 2026 रोजी सकाळी बौद्धजन पंचायत समिती तालुका शाखा माणगाव चे विद्यमान अध्यक्ष रविंद्र मोरे, सचिव रघुनाथ साळवी, सह सचिव रणजित मोहिते, कायदेशीर सल्लागार मुंबई उच्च न्यायालयाचे जेष्ठ विधीज्ञ ॲड नरेश जाधव, तालुका प्रसिद्धी प्रमुख पत्रकार उत्तम तांबे आणि पत्रकार विश्वास गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत पेण तळे शाखा क्रमांक अकरा या शाखेचे अध्यक्ष संतोष कासारे सर यांच्या अध्यक्षतेखाली वर्षावास धम्म प्रवचन मालिका कार्यक्रम मोठ्या उत्साहात व धम्ममय वातावरणात साजरा झाला.*

सदर कार्यक्रमाला बामसेफ आणि बुद्धिस्ट इंटरनॅशनल नेटवर्क चे सुर्यकांत कासे, सुजाता कासे मॅडम, प्रज्ञा धोत्रे मॅडम, कुंदा खरात मॅडम,दिपक मोरे, रमेश लोखंडे, मनवर सर, काशिनाथ कासारे, पैगाम चे भगवान गोसावी, गोसावी मॅडम, वसंत शिंदे पाली, शिंदे मॅडम, विठोबा मोरे , विनोद मोरे, सागर सकपाळ, दत्ताराम वडेकर, भगवान पाबरेकर, अरविंद मोरे, प्रकाश मोरे, टि. टि. मोरे,अमोल मोहिते, संदेश कासारे, संदेश साळवी, प्रकाश ओहाळ, बंडू मोरे,भाऊ ओव्हाळ, मनोज इवलेकर, मोहन जाधव,जनार्दन गायकवाड , रमेश गायकवाड, सखाराम गायकवाड, एकनाथ गायकवाड, रमेश घोगरे, महादेव पवार, सिद्धार्थ जाधव, सिद्धार्थ कासारे, यशवंत मोरे, सुमीत हाटे, किरण मोरे, चंद्रकांत येलवे, प्रदीप हाटे, विजय जाधव, देवेंद्र गायकवाड, विक्रम वाठोरे, गणेश मोरे इत्यादी प्रमुख पाहुणे आणि पंचशील महिला मंडळाच्या वर्षाराणी कासारे, स्नेहा कासारे, आरती कासारे, माधवी कासारे, मानसी कासारे, छाया कासारे, मनिषा कासारे, संगीता कासारे, नालंदा बौद्धजन सेवा संघ पेण तर्फे तळे मुंबई भावकीचे सचिव संदीप कासारे, उपाध्यक्ष विजय कासारे, खजिनदार अजित कासारे, सल्लागार काशिराम कासारे, सल्लागार योगेश कासारे, सल्लागार उमेश कासारे, संदेशवाहक प्रशांत कासारे, बौद्धजन पंचायत समिती शाखा क्रमांक 11 चे अध्यक्ष संतोष कासारे, सह सचिव उत्तम कासारे, खजिनदार मंगेश कासारे, संघटक आदित्य कासारे, प्रज्वल कासारे, स्पंदन कासारे इत्यादी पदाधिकारी व सर्व उपासक-उपासिका शुभ्र वस्त्र परिधान करून मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप कासारे यांनी केले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका अध्यक्ष रवींद्र मोरे यांनी केले.

कार्यक्रमाची रूपरेषा

आयोजकांनी नियोजित केल्याप्रमाणे कार्यक्रम खालीलप्रमाणे संपन्न झाला:

1) सकाळी 11.30 वा सुर्यकांत कासे सर यांच्या मंगल वाणीतून त्रिशरण पंचशील ग्रहण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

वंदना भिसे यांना पीएच.डी प्रदान

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या लोकप्रशासन विषयात जाफ्राबाद (जि. जालना) तालुक्यातील देऊळझरी येथील वंदना जनार्धन भिसे यांना विद्यापीठाने नुकतीच पीएच.डी प्रदान केली आहे. वंदना भिसे यांनी डॉ. सतीश दांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली "अनुसूचित जातीतील स्त्रियांवर होणारे अत्याचार आणि प्रशासनाची भूमिका महाराष्ट्राचा एक चिकित्सक अभ्यास " या विषयावर संशोधन कार्य पुर्ण केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल लोकप्रशासन विभागप्रमुख डॉ. श्याम शिरसाट, आई-वडिल पंखाबाई जनार्धन भिसे, सासू-सासरे रुख्मिणबाई काशिनाथ बनकर, पती संघदिप बनकर, भाऊ महादू भिसे, कृष्णा भिसे, भरत हिवराळे बोरगावकर आदींनी अभिनंदन केले आहे.

लासूरगावच्या दाक्षायणी माता मंदिरात नवरात्रोत्सवाला प्रारंभ



लासूर स्टेशन (प्रतिनिधी) : शिवना नदीच्या काठावर वसलेल्या ऐतिहासिक लासूरगाव येथील प्रसिद्ध श्री दाक्षायणी माता मंदिरात नवरात्रोत्सवाला प्रारंभ झाला असून, नऊ दिवस चालणाऱ्या या उत्सवात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासह राज्यभरातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या या मंदिरात नवरात्रोत्सवाच्या काळात दर्शनासाठी मोठी गर्दी होत असते. अशी माहिती वैजापूरचे तहसीलदार सावंत यांनी दिली.

नवरात्रोत्सवाच्या पहिल्या दिवशी घटस्थापना करण्यात आली असून, देवीला अलंकार चढवून विधिवत पूजन करण्यात आले. सोमवार, दि. १२ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजता सप्तशती पाठ होणार आहे. सोमवार, दि. १९ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते ११ या वेळेत होमहवन व पूर्णाहुतीचा कार्यक्रम होणार आहे. मंगळवार, दि. २० ऑक्टोबर रोजी विजयादशमीच्या दिवशी महाभिषेक, पानसुपारी, सीमोल्लंघन व सीमापूजन असे विविध धार्मिक कार्यक्रम पार पडणार आहेत.

लासूरगावचा उल्लेख काशीखंड या पुराणात आढळत असल्याची आख्यायिका आहे. हे गाव प्रजापती दक्षराजाच्या दक्षनगरीशी जोडले जाते. पौराणिक कथेनुसार, दक्षराजाची कन्या दाक्षायणी हिने भगवान शिवशंकरांशी विवाह व्हावा, यासाठी तपश्चर्या केली होती. पुढे तिचा विवाह शिवशंकरांशी झाला. मात्र, दक्षराजाने आयोजित केलेल्या यज्ञात भगवान शंकरांचा अवमान झाल्याने दाक्षायणीने यज्ञात देहत्याग केला. त्यानंतर भगवान शंकर आणि दक्षराज यांच्यात संघर्ष झाल्याची कथा सांगितली जाते. लासूरगावाजवळील टेकडीसदृश भागाला 'पालथीनगरी' म्हणून ओळखले जाते.

दाक्षायणी माता मंदिराची आकर्षक वास्तुरचना, सुंदर नक्षीकाम आणि शिल्पवैभव भाविकांचे लक्ष वेधून घेते. मंदिरासमोरील दीपमाळेवर कोरलेल्या वाघाच्या मूर्ती विशेष लक्षवेधी आहेत.

सोयगाव पोलीस स्टेशन येथे नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शांतता समितीची बैठक संपन्न

दुष्काळाचे भान ठेवून उत्सव साजरा करा - उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वजीत काईंगडे

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी



सोयगाव, दि.११ ऑक्टोबर

नवरात्रोत्सव २०२६ शांततेत आणि उत्साहात पार पडावा, तसेच कायदा-सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी सोयगाव पोलीस ठाण्याच्या वतीने शनिवारी

दि.१० शनिवार रोजी सायंकाळी ६ वाजता शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होते. उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वजीत काईंगडे आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही बैठक पार पडली.

बैठकीला शांतता समितीचे सदस्य,पत्रकार,पोलीस पाटील, नगरसेवक,दुर्गादेवी मंडळांचे अध्यक्ष,सदस्य व पदाधिकारी, महिला आणि नागरिक उपस्थित होते.

न्यायालयीन नियमांचे पालन करण्याचे आवाहन

नवरात्रोत्सवादरम्यान डीजेचा वापर करताना न्यायालयाने निर्धारित केलेल्या नियमांचे पालन करावे,असे आवाहन सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर गोरे यांनी बोलतानी सांगितले.ध्वनिप्रदूषण टाळावे,हुल्लडबाजी करू नये आणि सार्वजनिक शांतता भंग होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असेही त्यांनी सांगितले. तर

दुष्काळी परिस्थितीचे भान ठेवून उत्सव साजरा करा

महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता दुर्गादेवी मंडळांनी साधेपणाने आणि सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून उत्सव साजरा करावा,असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वजीत काईंगडे यांनी केले.एका बाजूला उत्सवाचा आनंद आणि दुसऱ्या बाजूला दुष्काळामुळे निर्माण झालेली परिस्थिती,याचे भान ठेवून अनावश्यक खर्च टाळावा,असे त्यांनी नमूद केले.

उत्सवादरम्यान शासनाच्या नियमांचे पालन करून पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे,असेही त्यांनी सांगितले. धार्मिक उत्सवांच्या माध्यमातून सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि शांतता टिकवून ठेवण्याचा संदेश या बैठकीत देण्यात आला.

वन्यजीव सप्ताहानिमित्त पाणदिवे येथील शाळेत निसर्ग संवर्धनाचा जागर

सर्पओळख, सर्पदंश प्रतिबंध, प्लास्टिक प्रदूषण आणि पाणीटंचाईबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन





उरण : वन्यजीव सप्ताह २०२६ निमित्त पुंडलिक रामा पाटील इंग्रजी माध्यम शाळा, पाणदिवे-उरण येथे फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन) – सर्पमित्र निसर्ग संवर्धन संस्था, चिरनेर, ता. उरण, जि. रायगड यांच्या वतीने निसर्ग संवर्धनविषयक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात वन्यजीवांचे निसर्गातील महत्त्व, सर्पओळख, सर्पदंशावरील प्रथमोपचार व प्रतिबंधात्मक उपाययोजना यांसह पर्यावरणाशी संबंधित विविध गंभीर विषयांवर विद्यार्थ्यांशी आणि उपस्थितांशी संवाद साधण्यात आला.

'शून्य सर्पदंश मृत्यू अभियान' हा कार्यक्रमाचा महत्त्वपूर्ण विषय होता. सापांच्या विविध प्रजातींची ओळख, सापांविषयी असलेले गैरसमज दूर करणे, सर्पदंशाच्या घटना टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी आणि सर्पदंश झाल्यास तातडीने वैद्यकीय उपचार घेण्याचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. साप आणि इतर वन्यजीव हे पर्यावरणाचा समतोल राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे वन्यजीवांचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचेही यावेळी अधोरेखित करण्यात आले.

याशिवाय वातावरणातील बदल, प्लास्टिक प्रदूषणाची वाढती गंभीर समस्या, भविष्यात भेडसावू शकणारी पाणीटंचाई आणि त्यावरील उपाययोजना यांविषयीही विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. प्लास्टिकचा वापर कमी करणे, पर्यावरणपूरक सवयी अंगीकारणे, पाण्याचा काटकसरीने वापर करणे आणि पावसाचे पाणी साठविण्यासारख्या उपाययोजनांबाबत जनजागृती करण्यात आली. संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष जयवंत ठाकूर आणि राकेश शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून निसर्ग, वन्यजीव आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व पटवून दिले. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करणे आणि निसर्ग संरक्षणाची भावना रुजविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या कार्यक्रमासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका योगीता गुरुनाथ गावंड, प्राची प्रशांत परदेशी, हेमांगी शैलेश गावंड, स्मिता मंगेश जाधव, सुरक्षा अविनाश भोईर आणि मनाली गावंड यांचे मोलाचे सहकार्य लाभले. वन्यजीवांचे संरक्षण, पर्यावरण संवर्धन आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग्य वापर यांचा संदेश देणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक ठरला.

कुमारी विधिता घरत बनली नागावची पहिली महिला डॉक्टर!

नागावच्या शिरपेचात मानाचा तुरा; सर्वत्र कौतुक आणि अभिनंदनाचा वर्षाव



उरण दि ११(विठ्ठल ममताबादे)नागाव गावच्या कन्या कुमारी विधिता मनीष घरत हिने वयाच्या अवघ्या २३व्या वर्षी डॉक्टर होण्याचा मान मिळवला असून, नागावची पहिली महिला डॉक्टर म्हणून तिच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. तिच्या या उल्लेखनीय यशामुळे नागाव गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, ग्रामस्थांमध्ये आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण आहे.

नागावचे सुपुत्र आणि समिधा क्रिकेट क्लबचे मालक मनीष शशिकांत घरत यांची विधिता ही द्वितीय कन्या आहे. मनीष घरत यांनी क्रिकेट संघाचे मालक म्हणून नागावच्या क्रिकेट क्षेत्राला वेगळी ओळख मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे नागावच्या क्रिकेट क्षेत्राची ओळख रायगड जिल्ह्यात निर्माण झाली आहे. आता त्यांच्या कन्या विधिता हिने वैद्यकीय क्षेत्रात यश संपादन करून गावाच्या नावलौकिकात आणखी भर घातली आहे.

विधिताच्या या यशामुळे ती गावातील मुलींसाठी प्रेरणादायी उदाहरण ठरली आहे. जिद्द, मेहनत आणि शिक्षणाच्या जोरावर मुलीही विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश मिळवू शकतात, हे तिने आपल्या कामगिरीतून दाखवून दिले आहे.

विधिता हिचे अभिनंदन करून तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यासाठी नागावचे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते वैभव यशवंत कडू यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या. विधिताच्या या यशाबद्दल नागाव परिसरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, तिच्या पुढील वैद्यकीय कारकिर्दीसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

‘प्रौढ प्रताप पुरंदर’ महानाट्याचे स्तंभपूजन संपन्न

छत्रपती शिवरायांचा पराक्रमी इतिहास रंगमंचावर उलगडणार; शहरात प्रथमच भव्य ऐतिहासिक महानाट्य

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनचरित्रावर आधारित ‘प्रौढ प्रताप पुरंदर’ या भव्य ऐतिहासिक महानाट्याचे स्तंभपूजन आज विधिवत पार पडले. शहरात प्रथमच साकारण्यात येत असलेल्या या महानाट्याच्या माध्यमातून शिवरायांचा पराक्रम, शौर्य, दूरदृष्टी आणि हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेचा गौरवशाली इतिहास रंगमंचावर जिवंत केला जाणार आहे.

या स्तंभपूजन सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विशेष कार्यकारी अधिकारी राजेंद्र साबळे, माजी केंद्रीय मंत्री डॉ. भागवत कराड, कॅबिनेट मंत्री अतुल सावे, आमदार अनुराधाताई चव्हाण, आमदार प्रशांत बंब, माजी आमदार संजय केणेकर, महापौर समीर राजूरकर, स्थायी समिती सभापती अनिल मकरीये, सभागृह नेते गोविंद केंद्रे, जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे, दक्षिण जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांच्यासह भाजपचे नगरसेवक आणि पदाधिकारी उपस्थित होते.

या महानाट्यात छत्रपती शिवाजी महाराजांचा संघर्षमय जीवनप्रवास, गड-किल्ल्यांचा इतिहास, मावळ्यांची निष्ठा आणि स्वराज्याच्या स्थापनेसाठी दिलेल्या बलिदानाची गाथा भव्य स्वरूपात सादर केली जाणार आहे. ‘प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता’ या स्वराज्याच्या प्रेरणादायी विचारातून शिवरायांच्या कार्याचा गौरव करण्यात येणार आहे.

इतिहासाचे नाट्यमय दर्शन घडविणारे हे महानाट्य इतिहासप्रेमी आणि नाट्यरसिकांसाठी आकर्षण ठरण्याची अपेक्षा आहे. शिवरायांचे विचार, स्वराज्याचा स्वाभिमान आणि त्यांच्या पराक्रमाची प्रेरणा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

स्तंभपूजनामुळे महानाट्याच्या उभारणीच्या कामाला प्रारंभ झाला असून, आगामी काळात या भव्य सादरीकरणातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाचा जागर केला जाणार आहे.

आराध्या कुबेरचे राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत रौप्यपदक; मनपा शाळेचा नावलौकिक वाढविला!

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : महाराष्ट्र शासनाच्या शालेय राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या एन-७, सिडको येथील केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी आराध्या कुबेर हिने फ्रीस्टाईल ५४ किलो वजन गटात रौप्यपदक पटकावले. रायगड येथे झालेल्या या स्पर्धेत अंतिम फेरीपर्यंत मजल मारत आराध्याने आपल्या उत्कृष्ट कामगिरीची छाप पाडली.

जिद्द, मेहनत आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर आराध्याने हे यश मिळविले. महानगरपालिका शाळेतील विद्यार्थिनीने राज्यस्तरावर कुस्तीमध्ये रौप्यपदक मिळविल्याने शाळेसह महानगरपालिकेच्या क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण आहे. तिच्या यशामुळे महानगरपालिका शाळांमधील विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या क्रीडा कौशल्याला पुन्हा एकदा वाव मिळाला आहे.

आराध्या कुबेर हिच्या या यशाबद्दल महापौर समीर राजूरकर, उपमहापौर राजेंद्र जंजाळ, स्थायी समिती सभापती अनिल मकरिये, विरोधी पक्षनेते समीर साजिद बिल्डर, सभागृह नेते गोविंद केंद्रे, महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, अतिरिक्त आयुक्त रणजित पाटील, उपआयुक्त अंकुश पांढरे, क्रीडा विभागप्रमुख विजय पाटील, क्रीडा अधिकारी संजीव बालय्या, कार्यक्रम अधिकारी ज्ञानदेव सांगळे, मुख्याध्यापक मनोज अग्रवाल, क्रीडा समन्वयक सागर मगरे आणि क्रीडा शिक्षक प्रितेश सराटे यांनी तिचे अभिनंदन केले.

आराध्याने भविष्यातही कुस्ती क्षेत्रात अशीच उज्ज्वल कामगिरी करून शहराचा नावलौकिक वाढवावा, अशा शुभेच्छा मान्यवरांनी दिल्या. तिच्या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही क्रीडा क्षेत्रात प्रगती करण्यासाठी प्रेरणा मिळणार आहे.

विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्याकडून मनपा शाळांना 40 हजारांची पुस्तके भेट

मनपाच्या आवाहनाला पहिल्याच दिवशी प्रतिसाद; 162 पुस्तकांचे दान

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि त्यांची वैचारिक जडणघडण व्हावी, यासाठी शाळांमध्ये ग्रंथालये उभारण्यात येत आहेत. या उपक्रमासाठी महानगरपालिकेने नागरिकांना वाचनीय पुस्तके दान करण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला पहिल्याच दिवशी प्रतिसाद देत विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी मनपा शाळांच्या ग्रंथालयांसाठी ४० हजार २१० रुपये किमतीची १६२ पुस्तके भेट दिली. महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातर्फे ‘हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियाना’अंतर्गत हा उपक्रम राबविण्यात येत आहे. विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी स्वतः खरेदी केलेली तसेच त्यांना भेट स्वरूपात मिळालेली ज्ञानवर्धक पुस्तके मनपाचे उपायुक्त अंकुश पांढरे आणि कार्यक्रम अधिकारी ज्ञानदेव सांगळे यांच्याकडे सुपूर्द केली.

जी. श्रीकांत यांनी यापूर्वी महानगरपालिका आयुक्त म्हणून कार्यरत असताना मनपा शाळांमधील विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी विविध उपक्रम राबविले होते. आता त्यांनी ग्रंथालयांसाठी पुस्तके देऊन विद्यार्थ्यांच्या वाचनविकासाला हातभार लावला आहे. “विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात आणि वैचारिक जडणघडणीत वाचनाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. महापालिकेचा हा उपक्रम स्तुत्य असून, समाजातील प्रत्येक घटकाने आणि स्वयंसेवी संस्थांनी या ज्ञानयज्ञात सहभागी व्हावे. त्यातून मनपा शाळांतील विद्यार्थ्यांना समृद्ध वाचनाची संधी उपलब्ध होईल,” अशी भावना विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी व्यक्त केली. मनपाच्या आवाहनाला मिळालेल्या या प्रतिसादामुळे इतर नागरिक, पुस्तकप्रेमी आणि स्वयंसेवी संस्थांनीही पुढे येऊन शाळांच्या ग्रंथालयांसाठी पुस्तके दान करावीत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

मराठवाड्यात दुष्काळ, पण प्रेमाचा नाही!

कोकणातील युवकांनी अनुभवले मराठवाड्याचे सामाजिक-सांस्कृतिक वास्तव; एमजीएममध्ये ‘अभिसरण’ उपक्रमाचा समारोप

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : मराठवाड्यात दुष्काळ असला तरी प्रेमाचा दुष्काळ नाही, अशा भावना कोकणातून आलेल्या युवकांनी ‘अभिसरण’ उपक्रमादरम्यान व्यक्त केल्या. महाराष्ट्रातील विविध भागांतील भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक वैविध्य जाणून घेण्यासाठी यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने राबविण्यात आलेल्या ‘अभिसरण. शोधूया स्वतःला... समजूया महाराष्ट्राला’ या उपक्रमाचा समारोप रविवारी एमजीएम स्कूलमधील श्रावस्ती हॉल येथे झाला.

या उपक्रमांतर्गत कोकणातील सुमारे ५० युवकांनी नऊ दिवस मराठवाड्याचा दौरा केला. छत्रपती संभाजीनगर, बीड, नांदेड आणि जालना जिल्हा केंद्राचे अध्यक्ष अंकुशराव कदम, सचिव नीलेश राऊत, अशा चार गटांत विभागलेल्या युवकांनी मराठवाड्याचा इतिहास, संस्कृती, शेती, पाणीप्रश्न, दुष्काळी परिस्थिती आणि सामाजिक वास्तव जवळून अनुभवले. या प्रवासातून महाराष्ट्रातील विविध भागांतील लोकजीवन समजून घेण्याची संधी युवकांना मिळाली.

यावेळी यशवंतराव चव्हाण सेंटरच्या छत्रपती संभाजीनगर यांच्या प्रेरणेतून हा उपक्रम सुरू करण्यात आला. प्रेमाच्या माजी कुलगुरू प्रा. डॉ. सुधीर गव्हाणे, शिवाजी गावंडे, डॉ. शिव कदम, डॉ. ह. नि. सोनकांबळे, प्रा. रणजित बायस, संतोष मेकाळे, सुबोध जाधव, श्रीकांत येरूळे, प्रवीण देशमुख यांच्यासह विद्यार्थी आणि मान्यवर उपस्थित होते. अंकुशराव कदम म्हणाले, आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण आणि खासदार शरदचंद्र पवार भावनेतून माणसे एकत्र आली पाहिजेत. विद्यार्थ्यांनी स्थानिक लोकांमध्ये राहून त्यांचे जीवन जवळून समजून घेतले. प्रत्यक्ष अनुभवातून मिळणारे ज्ञान अधिक महत्त्वाचे असते. बौद्ध तत्त्वज्ञानातील शील, समाधी आणि प्रज्ञा ही मूल्ये मानवी जीवनाला योग्य दिशा देणारी आहेत.

प्रा. डॉ. सुधीर गव्हाणे म्हणाले, संवादाची साधने वाढली असली तरी समाजातील विसंवादही वाढताना दिसत आहे. सांस्कृतिक संकोच दूर करून परस्परांमधील संवाद आणि समन्वय वाढविण्याची गरज आहे. यशवंतराव चव्हाण यांच्या कार्याचा आणि विचारांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. राजकारणातील पवित्रता जपणारे ते थोर नेते होते. ‘अभिसरण’मुळे युवकांना परस्परसंवाद, समजूतदारपणा आणि सहजीवनाचे महत्त्व समजण्यास मदत झाली.

महाराष्ट्राच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त यशवंतराव चव्हाण सेंटरच्या युवा विभागाने हा उपक्रम सुरू केला. यंदा या उपक्रमाची २० वी बॅच होती, अशी माहिती सचिव नीलेश राऊत यांनी दिली. उत्कृष्ट कार्याबद्दल नांदेडच्या गटाचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

त्रिमूर्ती हनुमान मंदिर यशवाडी येथे आ. विटेकर यांच्या हस्ते अभिषेक महापूजा

हिंदू प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

परभणी**परभणी जिल्ह्यात मानवत तालुक्यातील कोल्हा परिसरातील यशवडे येथील श्री त्रिमूर्ती हनुमान मंदिरात शनि अमावस्या यांचे औचित्य साधून दिनांक 10 ऑक्टोबर शनिवार रोजी कार्यसम्राट आमदार राजेश विटेकर यांच्या हस्ते महावीर मारुतीरायांचे अभिषेक महापूजा मोठ्या हर्ष उल्हास व भक्तिमय वातावरणात करण्यात आली यावेळी मंदिर परिसरात सुरू असलेले धार्मिक अनुस्कानाची सांगता हवन आणि पूर्णवतीसह विविध धार्मिक कार्यक्रम व्यवस्थित रित्या पार पडले

दरम्यान काही महिन्याच्या कालखंडानंतर त्रिमूर्ती हनुमान मंदिर भाविकांसाठी दर्शनासाठी शनिवारपासून खुले करण्यात आले मानवत तालुक्यातील यशवाडी देवस्थानचे अध्यक्ष श्री श्री 1008 शिवेंद्र शास्त्री महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली या मंदिरात धार्मिक अनुस्कानाचे आयोजन करण्यात आले होते या काळात साधना सेवा भिक्षा आणि समाज प्रबोधनाच्या माध्यमातून ग्रामस्थांची संपर्क साधून सेवा साधना भिक्षा आणि समाज प्रबोधनाचे महत्त्व सांगण्यात आले या धार्मिक श्रद्धे सोबतच सामाजिक योग आणि सेवाभाव जपण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला मंदिरासमोर आमदार राजेश विटेकर यांच्या प्रयत्नातून दोन कोटी रुपयांचा सभामंडप उभा करण्यात आला म्हणून याप्रसंगी मंदिर च्या वतीने आमदार राजेश विटेकर यांचा भव्य सत्कार करण्यात आला यावेळी जि प सदस्य तथा राखा तालुकाध्यक्ष दत्तराव जाधव पंचायत समिती सभापती विष्णू निर्वळ बाजार समितीचे उपसभापती नारायण भिसे मानवत खरेदी विक्री संघाचे संचालक मुकुंदराव मगर सरपंच संतोष लाडाने बाजार समितीचे संचालक बाळासाहेब मोरे रामराव अरगडे अशोक कचरे माजी सरपंच सचिन पठाडे सरपंच सुरज काकडे यांचा अनेक मान्यवर उपस्थित होते

याप्रसंगी ज्योतिषी व हनुमान साधक प्रसाद अमोलवार यांनी अनुष्ठान दरम्यान धार्मिक सेवा आणि समाज प्रबोधनाच्या कार्यात सहभाग घेतल्याबद्दल विविध गावांना भेटी देऊन ग्रामस्थांची संवाद साधण्यात आला धर्मकार्यासोबतच सामाजिक बांधिलकी जपणे आणि समाजाचे नाते घट्ट करून नाळ जोडणे हा या प्रमुख उपक्रमाचा उद्देश असून असे मंदिर संस्थांच्या वतीने सांगण्यात आले. परिसरातील त्रिमूर्ती हनुमान मंदिर हे मारुतीरायाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांचे मनोकामना पूर्ण होण्यासाठी हनुमान मंदिर शनिवारपासून खुले करण्यात आले असून नवीन मंडपाच्या कामाला सुरुवात होईपर्यंत भाविकांना मंदिरात जाऊन दर्शन घेता येणार आहे तसेच देवस्थानच्या वतीने दररोज अन्नछत्र चालविण्यात येत असून भाविकासह गरजू व्यक्तीने अन्न सेवा दिली जात आहे

धार्मिक परंपरे सोबत अन्नदान समाजसेवा आणि समाजप्रबोधनाचे उपक्रम राबविण्यात येत असल्याने यशवंत येथील त्रिमूर्ती हनुमान मंदिर भाविकांसाठी श्रद्धेचे केंद्र ठरत आहे भाविकांनी मंदिरात येऊन श्री मारुतीरायांच्या दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन देवस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

मुकुंदवाडी पोलिसांकडून गावठी कट्ट्यासह १९ वर्षीय तरुणाला अटक

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरात पोलिसांकडून गस्त आणि गुन्हेगारांविरोधातील कारवाई तीव्र करण्यात आली आहे. याचदरम्यान मुकुंदवाडी पोलिसांच्या विशेष पथकाने संतोषीमातानगर परिसरातून गावठी कट्टा आणि मॅगझीन जप्त करून प्रियांशु सतीश खोमणे (वय १९, रा. मुकुंदवाडी गाव) याला अटक केली. या प्रकरणी मुकुंदवाडी पोलीस ठाण्यात शस्त्र अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

१० ऑक्टोबर रोजी मुकुंदवाडी पोलीस ठाण्याचे निरीक्षक विवेक सोनवणे यांनी विशेष पथकाला परिसरात सतर्कतेने गस्त घालण्याच्या सूचना दिल्या होत्या. सणानिमित्त बाजारपेठांमध्ये वाढणारी गर्दी लक्षात घेता कायदा व सुव्यवस्था राखणे, तसेच अवैध धंद्यांना आळा घालण्याच्या दृष्टीने पोलिसांकडून खबरदारी घेण्यात येत होती.

यावेळी पोलीस अंमलदार संतोष भानुशे यांना गोपनीय माहिती मिळाली की, संतोषीमातानगर येथील दोन एकर मैदानाच्या भिंतीलगत एका इसमाने गावठी कट्टा लपवून ठेवला आहे. या माहितीच्या आधारे सहाय्यक पोलीस निरीक्षक रोहित गांगुर्डे यांनी वरिष्ठ निरीक्षक विवेक सोनवणे यांना माहिती दिली. त्यांच्या सूचनेनुसार विशेष पथकाने दोन पंचांच्या उपस्थितीत संबंधित ठिकाणी तपासणी केली. यावेळी प्रियांशु खोमणे हा तेथे आढळला. चौकशीत त्याने मैदानाच्या भिंतीलगत गावठी कट्टा लपवून ठेवल्याचे सांगितल्याने पोलिसांनी संबंधित जागेची पाहणी केली. तेथे मॅगझीनसह गावठी कट्टा आढळून आला. पोलिसांनी पंचनामा करून तो जप्त केला आणि आरोपीला अटक केली.

कंपनीत १.६८ कोटींची अफरातफर; बिहारमधून दोघांना अटक

मुख्य आरोपी एचआर अधिकारी फरार, वडील आणि भावाला घेतले ताब्यात

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : शहरातील एन.आर. इंडस्ट्रियल इलेक्ट्रिकल प्रा. लि. या कंपनीत २ कोटी ६८ लाख ८८ हजार ६८३ रुपयांची अफरातफर करून आर्थिक फसवणूक केल्याच्या प्रकरणात उस्मानपुरा पोलिसांनी बिहारमधून दोघांना अटक केली आहे. नितीनकुमार गोपालसिंग याने कंपनीत मानव संसाधन अधिकारी (एचआर) म्हणून काम करताना साथीदारांच्या मदतीने ही अफरातफर केल्याची तक्रार आहे. मुख्य आरोपी अद्याप पोलिसांच्या हाती लागलेला नाही.

या प्रकरणी कंपनीच्या मालकाने १० सप्टेंबर २०२६ रोजी उस्मानपुरा पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार, १ नोव्हेंबर २०२३ ते २३ जून २०२६ या कालावधीत कंपनीत आर्थिक अफरातफर करून फिर्यादीची २ कोटी ६८ लाख ८८ हजार ६८३ रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी उस्मानपुरा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २४२/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेतील कलम ३१६(४), ३१८(४), ३३५, ३३६(३), ३४०(१), ३३८ तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्यातील कलम ६६(सी) आणि ६६(डी) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांनी तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपींचा शोध सुरू केला. पोलीस उपनिरीक्षक किरण बोराडे यांच्यासह पथक बिहारमध्ये रवाना झाले. तेथे मुख्य आरोपी नितीनकुमार गोपालसिंग याचा शोध घेतला असता तो मिळून आला नाही. मात्र, त्याचा भाऊ नितेश कुमार गोपालसिंग (वय १८) आणि वडील गोपालसिंग (वय ५१, दोघेही रा. नरहा पानापूर, तेतरिया, बिहार) यांना पोलिसांनी ताब्यात घेऊन अटक केली. पोलिसांच्या माहितीनुसार, चौकशीत दोघांनी गुन्ह्याची कबुली दिली आहे. या दोघांकडे पुढील तपास सुरू असून मुख्य आरोपीचा शोध घेतला जात आहे.

पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस उपायुक्त स्नाकार नवले आणि सहाय्यक पोलीस आयुक्त सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज, पोलीस उपनिरीक्षक किरण बोराडे तसेच पोलीस अंमलदार चव्हाण, कऱ्हाळे आणि अरविंद पुरी यांनी ही कारवाई केली.

गावपातळीवरच दर्जेदार आरोग्य सेवा देण्यासाठी CPHC प्रशिक्षण

‘माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव’ व सेवा संकल्प अभियानांतर्गत कचनेर येथे प्रशिक्षण

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : ‘माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव’ व सेवा संकल्प अभियानांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, कचनेर येथे सर्वंकष प्राथमिक आरोग्य सेवा (CPHC) या विषयावर दोन दिवसीय प्रशिक्षण घेण्यात आले. गावपातळीवरच नागरिकांना दर्जेदार, सुलभ आणि वेळेवर आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यावर या प्रशिक्षणात भर देण्यात आला.

प्रशिक्षणाला जिल्हा माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. विशाल बेंद्रे, प्रशिक्षण केंद्राचे डॉ. विखे पाटील आणि तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रसन्न भाले यांनी भेट दिली. त्यांनी प्रशिक्षणार्थींशी संवाद साधून मार्गदर्शन केले.

१३ प्रमुख घटकांवर मार्गदर्शन

‘Resolve More, Refer Less’ या संकल्पनेनुसार नागरिकांच्या आरोग्य समस्यांचे निदान व उपचार स्थानिक पातळीवरच करण्यासाठी आरोग्य यंत्रणेची क्षमता वाढविण्यावर भर देण्यात आला. माता-बाल आरोग्य, संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजार, मानसिक आरोग्य, पॅलिएटिव्ह केअर, मौखिक आरोग्य, आपत्कालीन सेवा, योग व आयुष यांसह सर्वंकष प्राथमिक आरोग्य सेवेच्या १३ प्रमुख घटकांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

या प्रशिक्षणात डॉ. राणी मदगल, डॉ. महेश मरकड, डॉ. स्मिता जिघे, डॉ. आशिष वानखेडे, डॉ. प्रतिक्षा नेवसे, सुनील उन्हाळे, सखू शेलार, प्रणाली भांडे, शीतल देशमुख, शिवनाथ तावडे, संदीप पवार, सिद्धार्थ म्हस्के आणि स्वप्निल परदेशी यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

प्रशिक्षणात समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सेविका, आरोग्य सेवक, गटप्रवर्तक आणि आशा स्वयंसेविका अशा एकूण ५३ प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला. प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांच्या माध्यमातून स्थानिक पातळीवरच आरोग्य समस्यांचे प्रभावी निराकरण करणे आणि नागरिकांना सर्वंकष आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे हा प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश होता.

प्रशिक्षणाचे नियोजन शिवनाथ तावडे आणि सिद्धार्थ म्हस्के यांनी केले.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911